शनिवार । २ मे १९८१ । एक रुपया

# माणूस

" आज हे सर्व लिहीत असताना असह्य यातना होतात. आज आहे २४ एप्रिल १९८१. दुपारी निपाणीचा फोन लागला आणि समजलं की, शरद जोशी, सुभाष जोशी आणि इतर नेत्यांची चिकोडीच्या मॅजिस्ट्रेटनं जामिनावर सुटका केली. शरद जोशी निपाणीहून निघालेत आणि रात्री दहा वाजेपर्यंत पुण्याला पोचणार आहेत. तब्बल पंचेचाळीस दिवसांनी हा शेतकरी-नेता आपल्या घरी परतणार होता.

मी हे इथं लिहीत बसलोय; पण मनामध्ये विचारांचा नुसता कल्लोळ माजलाय. तंबाखू आंदोलनात जे पाहिलं, ऐकलं आणि अनुभवलं ते सगळं जसंच्या तसं कागदावर उतरून काढावं अशी इच्छा आहे. त्याचबरोबर हे लिहिण्यात फारसा काही अर्थ नाही असाही एक सूर अधूनमधून मनामध्ये उमटतोय !"....

**कां ?....**

**पुढील अंकापासून**
**सुरू होत आहे**
**'योद्धा शेतकरी' नंतरची**
**विजय परुळकर यांची**
**तितकीच प्रभावी लेखमाला**

## रक्तसूट

## संयुक्त महाराष्ट्र झाला... मराठी संस्कृती कुठे आहे?

पृष्ठ....७

उत्तरमीमांसा...

# शिखरस्थांची धावपळ

श्री. ग. मा.

भाजप हा कालपरवापर्यंत डाव्यांनी ' अस्पृश्य ' मानलेला पक्ष होता. पण प्रथम मधू लिमये व नंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट यांनी ही स्पर्शबंदी उठवलेली दिसते. मधू लिमये यांच्यासमोरील सध्याचा एककलमी कार्यक्रम म्हणजे येन-केन प्रकारेण लोकसभेत पुन्हा एकदा प्रवेश मिळवणे, एव-ढाच असावा. काँग्रेसवाल्यांना सत्तेशिवाय जगता येत नाही असे म्हणतात; पण विरोधकानाही एखादी खुर्ची, एखादी जागा हाती असल्याशिवाय लोकसेवा करता येत नाही असे दिसते. जयप्रकाश नारायण लोकसभेत न जाताही शेवटी लोकनायक ठरले. जयप्रकाशांचा वारसा चालवू म्हणणारे समाजवादी मात्र वर्ष–दोन वर्षांतच लोकसभा-विधान सभांशिवाय निर्माल्यवत ठरत आहेत. दुसऱ्यांच्या शिखर–राजनीतीवर तोंडसुख घेणारे स्वतः मात्र आपापली शिखर-स्थाने सोडायला कधी तयार नसतात. लोकांनी या शिखर-स्थानांवरून त्याना खाली खेचले तरी वाटेल ते करून पुन्हा त्याच शिखरांवर पोचण्याची त्यांची सतत धडपड चालू असते. मग यासाठी चरणसिंगांच्या घरच्या यज्ञसमारंभाला मधू लिमयांना जाणे आवश्यक वाटले, तर आपला सगळा यज्ञविरोधी सेक्युलॅरिझम गुंडाळून ठेवून मंडळी तिकडे धाव घेतात. कालपरवापर्यंत वाळीत टाकलेल्या भाजपला एकदम शुद्ध करून घेण्यात येते. मधू लिमये एकांडे शिले-दार असल्याने असे होते अशी समजूत करून घेण्यातही अर्थ नाही. तीन राज्यात ज्यांची सरकारे अस्तित्वात आहेत, जनसमूहप्रणीत क्रांतीची ठेकदारीच जणू आपल्याकडे आहे अशा थाटात जे वावरत असतात, त्या डाव्या कम्युनिस्टां-नाही शेवटी भाजपची आठवण का व्हावी ? इंदिरा गांधींनी जरा डोळे वटारल्यावर भाजपसारखा त्याच्या दृष्टीने उजवा, प्रतिगामी, अमेरिकन साम्राज्यवादाचा हस्तक वगैरे असलेला पक्ष एकदम त्यांना सहकारयोग्य वाटू लागणे, हे कशाचे लक्षण मानायचे ? सत्ताबाजीचे व्यसन या तथा-कथित क्रांतीवादी पक्षालाही ग्रासून राहिले आहे. इंदिरा गांधींनी कम्युनिस्टांची सरकारे उलथविण्याचे समजा ठर-वलेच असले तर हे लाल-बहादुर असे काही म्हणत नाहीत की, जनतेच्या पाठबळावर व पक्षसंघटनेच्या जोरावर आम्ही इंदिरा गांधींचा डाव हाणून पाडू, आज पडलो तरी उद्या पुन्हा वर उठू. लाल–बहादुर चालले भगव्या वीरांकडे मदत मागायला ! हे कसली क्रांती करणार ? बंगालमध्ये दोन वर्षे झाली यांना सत्तेवर येऊन. अजून आठ तास धड कार-खाने यांना नीट चालवता येत नाहीत. जमीनवाटपाचा कार्य-क्रम याना राबवून दाखवता आलेला नाही. असे काही ठोस व भरीव यश गाठीशी असते तर काय विशाद होती इंदिरा गांधींची ज्योती बसूना हाकलण्याची ? लोकांनीच बसूना पुन्हा बोलावले असते. पण ही खात्री नाही, म्हणून ही इंदिरा विरोधी आघाडीची बांग एकदम पुकारली गेली. तशी ही एक अत्यंत अहंकारी आणि घमेंडखोर जमात. अहंकार गिळण्याचे, घमेंड उतरण्याचे प्रसंगही राजकारणात कधी कधी येतात. पण अवघ्या दोनअडीच वर्षांत असा प्रसंग जनसमूहवादी क्रांतिकारकांवर यावा हा ' झटपट करू दे खटपटी 'चाच राजकीय आविष्कार आहे, दुसरे काय ? ◻

झटपट काही तरी खटपट करून पुन्हा एकदा सत्तेच्या शिखरावर पोचावे, असे भाजपमधील काही मंडळीनाही वाटू लागलेले असावे. नाही तर कम्युनिस्टांच्या सह–कार्याच्या आवाहनावरून पक्षात मतभेद माजण्याचे काहीच


## साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे

अंक : अट्ठेचाळिसावा

२ मे १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

कारण नव्हते. मतभेद नव्हतेच या म्हणण्याला काहीच अर्थ नाही. मार्क्सवादी कम्युनिस्टांशी सहकार्य करण्यास वाजपेयी एका पायावर तयार असावेत असे त्यांनी कोचीन विमानतळावर पत्रकारांना जी मुलाखत दिली त्यावरून दिसते. उलट पक्षाचे सरचिटणीस जनकृष्णमूर्ती यांची भूमिका खणखणीत व रोखठोक वाटली म्हणजे नंबूद्रिपाद अटलबिहारी, ज्योती बसू ही शिखरस्थ मंडळी एका बाजूस व कार्यकर्ते दुसऱ्या बाजूस अशी फाळणी दिसते. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना ऐक्य-सहकार्य नको आहे. कारण त्यांचे दैनंदिन अनुभव वेगळे आहेत, कटुतापूर्ण आहेत. उलट दिल्लीतल्या शिखरस्थांना फक्त इंदिरा गांधी हा एकच शत्रू दिसतो आहे व तो हटवण्याची पुन्हा त्याना घाई सुटली असावी. विरोधकांची आवळयाभोपळयाची मोट हा इंदिरा गांधीना समर्थ पर्याय ठरू शकत नाही,हा गेल्या दहा वर्षातला अनुभव कुणालाच काही शिकवून गेला नाही असे दिसते. अशी आवळयाभोपळयांची मोट समजा बाधली गेली, तिला जरी काही काळ सत्ता मिळाली तरी देशातील राजकीय अस्थिरता कमी होत नाही, असा जनता पक्षाच्या कारकीर्दीचा अनुभव अगदी ताजाच आहे. यापेक्षा केरळ-बंगालमध्ये कम्युनिस्ट आहेत तिथे त्यांना ठरलेल्या मुदतीपर्यंत घटनेच्या चौकटीत राज्य करू देणे शहाणपणाचे ठरेल. तेथील जनतेला ते नकोसे होतील तेव्हा आपोआप नवा पर्याय निर्माण होईल. मध्यप्रदेश, राजस्थान या भागात भाजपचा जोर आहे. उत्तरप्रदेशात लोकदलाला स्थान आहे. हे आपापले तळ स्वबळाबर घट्ट करून सधी मिळाल्यावर आपापल्या पक्षाच्या राजवटी तेथे आणण्याचे मर्यादित उद्दिष्टच विरोधकांनी डोळयांसमोर ठेवणे देशाच्या व त्यांच्या दृष्टीनेही अधिक हितावह आहे. दिल्ली समजा अगदी कबजात आली तरी ती साभाळण्याची ताकद विरोधकांपैकी आज कुणातही नाही. जनता पक्ष फोडणारे आणि हाती आलेली सत्ता गमावणारे नेते लोकाना आज दृष्टीसमोरही नको आहेत. अगोदर लोकांचा विश्वास आणि नंतर सत्ता असा क्रम हवा त्याऐवजी पुन्हा ७२ मधली किंवा ७७ मधली सर्कस उभी करण्याची दुर्बुद्धी या नंबुद्रिपादांना किंवा अटलबिहारीना का व्हावी ? शिवाय ७५ सालची आणीबाणी लादण्याची चूक इंदिरा गांधी करतील अशी शक्यता मुळीच नाही. त्याची लोकप्रियताही कमी झालेली नाही. युद्धाचे ढग जमू लागलेले आहेतच. अशा स्थितीत भाजपने पक्षसघटना वाढवण्यावरच सर्व लक्ष केंद्रित करायला हवे. मार्क्सवादी कम्युनिस्टांनी जरा खुणावले, मधू लिमये जरा अवतीभवती शुकशुक करू लागले,की भाजप जर पाघळणार असेल तर हा कसला आला आहे समर्थ पर्याय ? ७७ चीच ही नवीन आवृत्ती ठरेल व फार तर मोरारजींऐवजी अटलजी पतप्रधानपदी विराजमान झाल्याचे नेत्रसुख भाजपवाल्यांना अनुभवता येईल; पण हा पतप्रधान नामधारीच राहील व मोरारजीप्रमाणे अठ्ठावीस महिनेही टिकणार नाही. गाठ या वेळी कम्युनिस्टांशी बाधली जाणार आहे आणि कम्युनिस्टांनी स्टॅलिनचा खूनबाजीचा वारसा अद्याप सोडलेला नाही. सवाई खून करण्याची व ते पचवण्याची ताकद असेल तर जरूर स्टॅलिनचा वारसा न सोडणाऱ्या कम्युनिस्टाशी हातमिळवणीचा धोका पत्करावा. नाही तर अशा हातमिळवणीचा शेवट काबूल पर्यंत आलेले रशियन रणगाडे दिल्लीपर्यंत पोचण्यातही होऊ शकतो. ' जिसकी फौज उसका राज' हे राजकारणातले ध्रुवसत्य आहे. कम्युनिस्टांपेक्षा आपली फौज वाढेल कशी, त्यासाठी जनतेचा विश्वास कसा संपादन करता येईल, याची काळजी सद्य:स्थितीत भाजप किंवा तत्सम मंडळींनी अधिक वाहिली पाहिजे. समझोते, तडजोडीचा विचार करण्याची ही वेळ नाही. त्यातल्या त्यात ज्यांचा राष्ट्रवाद संशयातीत नाही अशांपासून तर सध्या तरी चार हात दूरच राहिलेले बरे ! एखादा हो चि मिन्ह असता तर गोष्ट वेगळी. अजून ज्याच्या कचेऱ्यांतून स्टॅलिनचे फोटो लटकावलेले दिसतात त्यांचा कसा विश्वास धरावा ?

याचा अर्थ केरळ-बंगालमधील कम्युनिस्टाची सरकारे पाडण्यास इंदिरा गांधीना मदत करावी असा नाही. कम्युनिस्ट इतराचा जगण्याचा वाढण्याचा हक्क मान्य करत असतील, लोकशाहीची पथ्ये पाळत असतील तर त्यानाही लोकशाहीप्रणित मार्गाने जगण्या-वाढण्याचा हक्क आहे व तो असाधारण प्रसंग वगळता त्यांच्याकडून काढून घेणे अप्रामाणिकपणाचे आहे. केरळ-बंगालमध्ये अशी असाधारण स्थिती निर्माण झाली आहे का ? निष्पक्षपाती व्यक्तींचे एखादे मंडळ नेमून याचा शोध घ्यायला हवा. वर्तमानपत्री प्रचारावर किंवा कॉंग्रेस (आय) किंवा इतर पक्षीय नेत्याच्या शब्दावर केवळ विश्वासून याबाबत निर्णय घेतला जाऊ नये. बाकी इंदिरा विरोधी आघाडी उघडण्याच्या कम्युनिस्टांच्या व्यापक आवाहनाला प्रतिसाद देण्याची सध्या तरी गरज नाही. विशेषत: भाजपने तर मुळीच नाही. कारण वैचारिकदृष्टया हे दोन अगदी भिन्न प्रवाह आहेत. खाजगी मालकी नष्ट करणे हे मार्क्सवादाचे

प्रधान तत्त्व आहे. उलट लहान व मध्यम शेतकरी, शहरातील दुकानदार–व्यापारी व सर्वसाधारण मध्यमवर्ग याच्या पाठिंब्यावर भाजप उभा आहे. मुस्लिम प्रश्न तर आपल्याकडील डाव्याना अद्याप समजलेलाच नाही. हिंदूची कत्तल करणाऱ्या मोपल्याना नंबुद्रिपाद स्वातंत्र्यसैनिक समजतात. गांधीवादी समाजरचना वगैरे स्वीकारल्यापासून भाजप याबाबतीत थोडा गुळमुळीत झाला असला तरी पक्षातील सर्वसाधारण सभासद आज नाही उद्या आपला मूळचा हिंदुस्वर प्रखर केल्याशिवाय राहणार नाहीत, हे उघड आहे आणि इंदिरा गाधीच्या मूल्यमापनाबाबतही फरक आहेतच. अशा स्थितीत भाजपच्या कोचीन येथील बैठकीत डाव्या कम्युनिस्टांशी तूर्त सहकार्य न करण्याचा जो निर्णय घेतला गेला तो योग्यच म्हटला पाहिजे. भाजपमध्ये मतभेद नाहीत असे शेवटी नेते कितीही जाहीर करोत, अटलजी प्रभृतीना अशा सहकार्याची भूक होती, कोचीनला उपस्थित असणाऱ्या बहुसंख्य पक्षसदस्याना नव्हती, हे काही लपून राहिलेले नाही. तसेच 'आम्ही सहकार्याचे आवाहन केलेच नव्हते' असे डाव्या कम्युनिस्टांनी आता कितीही म्हटले तरी त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. द्राक्षे मिळाली नाहीत की त्यांना आंबट म्हटले जातेच. सगळ्या पक्षाची शिखरस्थ मंडळी पुन्हा एकमेकांना खुणावू लागली आहेत. पक्षाच्या तळच्या कार्यकर्त्यांनी जोर धरून आपापल्या नेतेमंडळीना आवरून धरायला हवे. ७२ ची बडी आघाडी बदनाम झाली. ७७ चा जनता पक्ष प्रयोग फसला. फसणारे प्रयोग पुन्हा पुन्हा करत राहण्यात काहीच मतलब नाही. पेशवे अटकेपार गेले; पण पाच जिल्ह्यांपुरतेच मर्यादित असलेले शिवाजीचे लहानसे राज्य पेशव्यांच्या साम्राज्यापेक्षा अधिक वळकट होते. हा आदर्श आजच्या काळात इंदिरा गांधींचा समर्थ पर्याय खडा करणाऱ्यांनी डोळ्यांसमोर ठेवणे त्यांच्या व देशाच्या दृष्टीनेही हितावह आहे. □

पुणे वार्ता

# वसंत व्याख्यानमाला : पहिले चार दिवस

शंभर वर्षांपूर्वी पुण्यातील सामाजिक परिस्थिती आजच्यापेक्षा अगदी भिन्न होती. लोकमान्याचा तो बहराचा काळ होता. स्वदेशीच्या चळवळीने मूळ धरले होते आणि अशा परिस्थितीत समाजाशी संपर्क साधण्याच्या निमित्ताने पुण्यात 'वसंत व्याख्यानमाला' सुरू झाली असावी. ही व्याख्यानमाला गेले शतकभर नित्यनियमाने दरवर्षी पुण्यनगरीतील बुद्धिवंतांना वैचारिक खाद्य तर सामान्यांना ज्ञान देत आलेली आहे. या वर्षीचे १०७ वे वर्ष ज्ञानसत्र वसंत व्याख्यानमालेनं नुकतंच सुरू केलंय. पुण्यात कुणालाही संध्याकाळी काय करायच असा प्रश्न पडू नये इतके विविध प्रकारचे कार्यक्रम रोजच्या रोज इथं होत असतात. अशाच कार्यक्रमात वसत व्याख्यानमाला ही एक महत्त्वाचा घटक बनली आहे.

व्याख्यानमालेनं आपली सुरुवात तर शाही इतमामाने केली म्हणजे राज्यपाल आणि ऊर्जामंत्री यांच्या उपस्थितीतच व्याख्यानमाला सुरू झाली. त्यानंतर गेल्या ४–५ दिवसांत वेगवेगळ्या विषयांवरील तज्ज्ञाची व्याख्याने विचारप्रवर्तकच होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याचं वक्तृत्व म्हणजे साक्षात ज्ञानानुभव. त्यानी या वर्षी सेनापती बापटांच्या कार्याचा व कर्तृत्वाचा आढावा घेतला. खरं तर हा नुसता आढावा नव्हताच तर सेनापतीच्या जीवनाचा तर्कतीर्थांना भावलेला अर्थ त्यांनी उलगडून दाखवला. 'सेनापती बापटानी आत्मज्ञानाच्या तत्त्वाचा पुरस्कार केला, त्यासाठी प्राणयज्ञदलही उभारण्याचा प्रयत्न केला, प्रत्येक लढ्यातून भाग घेतला, अनेक वर्षं कारावास भोगला; पण त्याना स्वत:ला कधी आत्मयज्ञाची योग्य संधीच मिळाली नाही.' असं सागून तर्कतीर्थ म्हणाले, 'प्रत्येक विचारवंत नेत्यावर विवेकाचे बंधन असते. योग्य, यथार्थ वेळेची, रॅशनल संधीची तो वाट पहात असतो आणि म्हणूनच सेनापतीनाही तशी समर्थनीय उत्कृष्ट संधी लाभली नसावी.'

'सेनापतीच्या मानव्यात दिव्य होते. हा माणूस विलक्षण धैर्यशाली, संसाराबद्दल ओढ असणारा, पत्नीवर प्रेम करणारा आणि या आपल्या माणसांसाठी काही करू न शकल्याबद्दल खंतही बाळगणारा असा विलक्षण व्यक्तिमत्त्वाचा होता' अशी सेनापतीच्या जीवनाची फोडही तर्कतीर्थांनी केली.

याच व्याख्यानमालेत डॉ. बाबा आढाव यांचंही 'गुजराथमधील राखीव जागांचे आदोलन' या विषयावर भाषण झालं, तर प्रख्यात संगीतज्ज्ञ डॉ. अशोक रानडे यांचं 'समाज, संस्कृती व संगीत' या विषयावर व्याख्यान झालं. डॉ. रानडे नेहमीच वेगळ्या वाटेनं विचार करणारे संगीतज्ज्ञ आहेत. त्यानी या वेळी एक नवीनच विचार मांडला. त्याची खंत एवढीच की समाजाच्या दैनंदिन जीवनात संगीताला केंद्रस्थान राहिले नसून त्याला व्यासपीठावरच एखाद्या पुतळ्याचे स्थान दिले गेले आहे. संगीताचा सास्कृतिक व सामाजिक बदलांशी असलेला अन्य संबंध शोधण्याचा प्रयत्न डॉ. रानडेंनी केला. ते म्हणाले, 'संगीताचे प्रमाण वाढले तरी गुणवत्ता वाढली नाही. ग्रामोफोन, रेडिओ,

रेकॉर्डस्, संगीत कार्यक्रम वाढले तरी संगीताची जाण वाढली असं म्हणता येणार नाही. कारण आज आपण संगीताचा उपयोग फक्त वातावरणनिर्मितीसाठी करतो. सत्यनारायण, गणेशोत्सव या वेळी वाजणाऱ्या रेकॉर्डस् काय दर्शवतात !'

'आज संस्कृतीतलाच स्वत.चा कंटाळा आलाय' असं डॉ. रानडेंना वाटतं. आज संगीताचं व्यावसायीकरण होत असताना काही प्रमाणात कलात्मक ऱ्हास झाला असही त्याना वाटत. अर्थात अभिजात संगीताची जाण सर्वांना असावी किंवा असत असं वाटण मला तरी अस्वाभाविक वाटत. आजवरच्या इतिहासात अभिजात संगीतानं जास्तीत जास्त समाजाला आकृष्ट करुन घेतल्याचे दाखले मिळणं मुश्किल आहे आणि म्हणूनच मग लाइट क्लासिकल, असा प्रकार रूढ झाला. बैठकीतला ख्याल आणि चित्रपटगीत हे केवळ 'संगीत' या सदरा‑खाली घालून त्याना एकच मानदंड वा निकष लावण गैर आहे असं मला वाटत. *त्यामुळं जास्त 'सोप' संगीत जास्त लोकांपर्यंत* जाणार हे स्वाभाविक आहे; पण डॉ. रानडेंनी हा वगळचा पायवाटेचा विचार माडून विचाराना चालना दिली हेही नसे थोडके !

नाना फडणीस यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वावर वेगळ्या दृष्टिकोनातून विचार‑प्रवर्तक ठरणारे विचार साहित्यिक डॉ. भीमराव कुलकर्णी यानी 'नाना फडणीसः तीनशे वर्षांचो पोटदुखी' या विषयावर *बोलताना व्यक्त* केले.

नाना फडणीस हे जबरदस्त व्यक्तिमत्त्व होते. इंग्रजाना जरबेत ठेवणारे नाना, मराठी राज्यावर पकड ठेवणारे नाना, पेशव्यानाही मुठीत ठेवणारे नाना आणि लहानपणीच कार्टेशूळ जबरदस्त असल्याची कबुली देणारे नाना अशा या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचा शोध डॉ. कुलकर्णींनी घेतला.

नानाच्या मत्सरापोटीच ज्या आख्यायिका मुद्दामहून प्रसृत करण्यात आल्या त्यातून कलाकृती उभा राहू शकते; पण इतिहास मात्र उभाराहू शकत नाही. नाना व घाशीराम याच्या उज्ज्वल जीवनावरील दंतकथा या फक्त ललितकृतीच असतात, त्याचा इतिहासाशी काडीमात्रही संबंध नसतो असं मत डॉ. भीमराव कुलकर्णींनी व्यक्त केलं.

*व्याख्यानमालेत अजूनही बरेच मोठमोठे* वक्ते बोलणार आहेत. या आठवड्यातील या काही वेगळ्या वैचारिक वाटा शोधणाऱ्या विचाराचा आढावा या वेळी घेतला.

'उन्हाळा, वसंतऋतू, कोकिळगान वगैरे गोष्टीचा संबंध साहित्यात ठीक असतो पण प्रत्यक्षात ? उन्हाळ्यात आता पुण्यातल्या विविध उपक्रमाना अगदी ऊत आला आहे. वसंत व्याख्यानमाला सुरू झाली. आता लवकरच मॅजेस्टिक साहित्यिक गप्पाही सुरू होतील. या वर्षी लेखक‑वाचक भेट, दि. बा. मोकाशी, जादूगार रघुवीर आणि व्यंगचित्रकार शि. द. फडणीस याच्या प्रकट मुलाखती आणि बाकी परिसंवाद, नाट्यसंगीत वगैरे कार्यक्रम होणार आहेत.

# ऊस विकास योजना

ऊस आंदोलनानं महाराष्ट्रात नुसती वरवरच हवा निर्माण केली नाही. म्हणजे हे आंदोलन उसाला चांगला भाव मिळण्यावरच थांबलं नाही तर उसाचे उत्पादन महाराष्ट्रात वाढविण्यासाठी पर्यायाने साखरउत्पादन अधिक प्रमाणात वाढविण्यासाठी काही विधायक प्रयत्न करण्याची प्रेरणाही ऊस‑आंदोलनाने दिली.

या प्रयत्नाचा पहिला भाग म्हणजे महाराष्ट्रातल्या सर्व साखरकारखान्याचे शेतीअधिकारी, शासकीय कृषिअधिकारी व तज्ज्ञ याचा एक संयुक्त मेळावा प्रथमच घडून आला. आजवर या कारखान्यामध्ये, शासनामध्ये व तज्ज्ञामध्ये डायलॉगच नव्हता तो या मेळाव्याने सुरू झाला. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, राहुरी कृषि विद्यापीठाचे पाडेगाव संशोधन केंद्र आणि डेक्कन शुगर इन्स्टिटयूट या तीनही साखरव्यवसायाशी निगडित संस्थानी एकत्र येऊन या मेळाव्याचे आयोजन केले.

महाराष्ट्रात आजमितीला ७९ साखरकारखाने आहेत. पैकी १० खाजगी मालकीचे तर ६९ सहकारी असे आहेत. ऊस‑उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने उसाच्या नवनवीन जातीची मोठ्या प्रमाणावर लागवड करणं आवश्यक ठरते. या नवीन जातीमध्ये उसाचा उतारा जास्त आणि म्हणूनच साखरेचं उत्पादनही जास्त असल्याने त्याचं महत्त्व या मेळाव्यात सागितलं गेलं.

मेळाव्यात बोलताना साखर कारखाना संघाचे श्री. माधवराव बोरास्ते म्हणाले 'साखरकारखान्यानी ऊस विकास यंत्रणा नेमून त्याच्यामार्फत ऊसविकास घडवून आणला पाहिजे. त्यासंबंधीच्या अडचणी शासन व वित्तसंस्थेच्या पातळीवर संघाने सोडविल्या पाहिजेत.'

उसाच्या बाबतीत नवनवे संशोधन होऊनही *त्याचे ज्ञान सामान्य शेतकऱ्यांपर्यंत* जात नाही हा अनुभव आहे. याच गोष्टीवर बोट ठेवून मेळाव्याला आवर्जून उपस्थित राहिलेले खा. वसंतदादा पाटील म्हणाले, 'ऊस विकासाच्या या कार्याला व्यावहारिक‑दृष्टया शेतकऱ्यापर्यंत पोचविणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला त्याचे महत्त्व समजून देऊन त्याच्याकडून काम करवून घेतल्या‑शिवाय ऊस विकास योजनेला गती मिळणार नाही.'

*हा मेळावा म्हणजे महाराष्ट्राच्या साखर*‑उद्योगातील 'क्रांती'च म्हणायला हवी. या वर्षी महाराष्ट्राच्या साखरउत्पादनात लक्षणीय वाढ झालेलीच आहे. गेल्या वर्षी १३ लाख टन उत्पादन करणाऱ्या या राज्यात या वर्षी २१ लाख टन साखर उत्पादित झाली आहे. आजपर्यंतचे हे उत्पादन १९ लाख ६५ हजार टन एवढे झाले आहे. या वर्षी देशाच्या संकल्पित ५२ लाख टन उत्पादनापैकी २१ लाख टन साखर फक्त महाराष्ट्रात उत्पादित होते ही गोष्ट लक्षणीयच म्हणायला हवी.

साखरेचे उत्पादन वाढले तरी त्याचा भावावर काही परिणाम होईल का हा ग्राहकांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न. भारताची साखरेची गरज फार मोठी आहे. ती गरज देशातील उत्पादनावर भागून पुन्हा साखर निर्यात करता येईल एवढे उत्पादन होण्यास अजून काही काळ जावा लागेल. त्यामुळे आणखी काही काळ तरी साखरेचे थोडयाफार प्रमाणात शॉर्टेज *येणे स्वाभाविक* असल्याचे मत कारखानासंघाचे कार्यकारी अधिकारी श्री. के वी. जितकर यानी सांगितले.

—प्रतिनिधी

## मुक्ताफळे

# राजनीतीतील कोल्हे

अरस कॉंग्रेस नावाचा एक राजकीय पक्ष आपल्या देशात आहे. याच पक्षाला महाराष्ट्रात कुणीकुणी चव्हाण कॉंग्रेस म्हणतात. आता लवकरच या पक्षाच्या अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. या थोर पदासाठी दोन इच्छुक आहेत. एक शरदराव पवार व दुसरे देवराज अरस. आता या दोघांपैकी कोणाला निवडावे बरे? असा गंभीर प्रश्न सर्वांपुढे आहे. या दोघांपैकी देवराज अरस याची ओळख आज आम्ही करून देणार आहोत. ओळख नीट पटावी यासाठी आम्हाला एक हकीगत सांगावी लागेल. ती शांत चित्ताने सर्वांनी प्रथम ग्रहण करावी. हकीगत अशी–

कर्नाटक राज्याचे सार्वजनिक बांधकामखाते हे इतर राज्यातील बांधकामखात्याप्रमाणे नामांकित खाते मानले जाते. या खात्याचे मुख्य सचीव सुबय्या नावाचे चीफ इंजिनिअर आहेत. यांच्या घराची कर्नाटक राज्याच्या व्हिजिलन्स कमिशनरकडून नुकतीच झडती झाली. मार्च १६ ते मार्च २८ अशी १३ दिवस झडती चालू होती. टेहळणी खात्याला घरात काय काय बरे सापडले? यादी अशी–

अबब!

(१) आठ लाख एक्याऐंशी हजार रुपये रोख!

(२) दोन लक्ष ऐंशी हजाराचे सुवर्णदागिने.

(३) चार लाख अठ्ठेचाळीस हजाराचे रोखे.

(४) बासष्ट हजाराचे चांदीचे नग.

(५) एक लाखाहून अधिक किंमतीच्या गृहवस्तू. याशिवाय चार सुसज्ज बंगले व तीन फ्लॅटस् या चीफ इंजिनिअरानी खरेदी केलेले असून त्याची मोजदाद व्हायची आहे.

आता टेहळणी खात्याच्या अधिकाऱ्याने जर सुबय्या याना विचारले असते की–'एवढे पैसे आपल्याकडे कसे आले?' तर ते बहुधा म्हणाले असते–

'कामाच्या बदल्यात मी पैसे घेतलेले नाहीत. सर्व कंत्राटदाराची कामे अगदी नियमानुसार मी पुरी केली, जी होणारच होती. त्यानंतर जर कंत्राटदारानी मला पैसे दिले तर मी ते काय 'नको' म्हणायचे? आता मी मुख्यमंत्री नसल्याने मला पैसे चेकने न घेता, रोख घ्यावे लागले व या पैशाचा फंड मला जाहीरपणे वापरता येत नाही; परंतु हा सर्व पैसा मी गरिबासाठीच खर्च करीत असतो. माझे चार बंगले बांधले तेव्हा अनेक गरिबांना रोजगार मी उपलब्ध केला. सोन्याचे दागिने केले तेव्हा सुवर्णनियंत्रणाने बेकारीची कुऱ्हाड कोसळलेल्या गरीब सोनारांना मी काम उपलब्ध केले. माझे अनेक गरीब नातेवाईक आज सुखाने खात आहेत...'

आता हे जे सुबय्या–जे सध्या बांधकामखात्याचे प्रमुख सचीव आहेत, हे काही गुंडुरावाचे रत्न नाही. हे रत्न आहे देवराज अरस याचे!

१९७३ साली देवराज अरस मुख्यमंत्री असताना सुबय्या हे हेमावती पाटबंधारे पट्ट्याचे कार्यकारी अभियंता म्हणजे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर होते. लाखो रुपये त्यानी 'गरिबासाठी' जमा केले. त्या वेळचे टेहळणी कमिशनर गोविंदराजू यांनी सुबय्यांना मुद्देमालासह पकडले व अहवाल देवराज अरस यांना पाठवला. देवराज अरस याना अर्थात सुबय्या नेहमीच भेटत असत. मुख्यमंत्र्यांनी गोविंदराजूना झापले–

'सुबय्या हे निर्दोष आहेत!'

सुबय्यांची ही देशसेवा, देवराज अरस यांचे पाटबंधारेमंत्री चिन्नबसप्पा याना पसंत नव्हती. हा मोठाच काटा या देशभक्ताच्या मार्गात आला होता; पण त्यांचे नशीबच थोर. चिन्नबसप्पा आजारी पडले. झाले. त्यांचे खाते–काही काळ देवराज अरसनी आपल्याकडेच घेतले. त्या वेळी शिमोग्याला गोपालशेट्टी म्हणून अधीक्षक अभियंता होते. रिटायर व्हायला त्यांना अवधी होता; पण देवराज अरसना घाई होती. त्यांनी गोपालशेट्टींना निवृत्तीपूर्वी घरी लावले आणि त्याचे जागी सुबय्या यांना अधीक्षक अभियंता–सुपरिंटेंडिंग इंजिनियर म्हणून बढती दिली. सर्व छान चालू झाले.

पुढे आणीबाणी आली. इंदिराजींचा फतवा आला–'गैरमार्गाने पैसा जमा करणाऱ्या अधिकाऱ्याना निवृत्त करा.' सचिवालयाने सुबय्यांची गोपनीय फाइल देवराज अरसपुढे ठेवली. देवराज अरसनी लिहिले–

'सुबय्या हे संपूर्ण पाटबंधारेखात्यात सर्वात निष्णात इंजिनिअर आहेत. लाचखोरीला ते वश होणारे नाहीत आणि शिवाय कार्यकुशल आहेत!' सचिवालय चाट झाले!

अरस मंत्रिमंडळ १९७८ मध्ये गेले. निवडणुका झाल्या. पुनः अरसच मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री झाल्याबरोबर निवडणुकीचे कर्ज फेडल्यासारखे, त्यानी सुबय्यांना लघु पाटबंधारे खाते विभागाचे चीफ इंजिनिअर करून टाकले. चैनच चैन! इंदिराजीशी देवराजाचे फाटले आणि अरसना जावे लागले, गुंडुराव आले...आणि आता देशभक्त सुबय्यावर ही टेहळणी धाड पडली.

सुबय्याचे पुढे काय व्हायचे ते होईल. म्हणजे यथावकाश पोलीसखात्याचा लाभांश देऊन होताच ते निर्दोष सुटतील, याबद्दल शंका नाही सांगायचा मुद्दा तो नाही. तर देवराज अरस हे तसे गुणाचे चाहते आहेत देशभक्त, गरिबाच्या कनवाळू अधिकाऱ्यांना ते कसा बढत्या देतात वगैरे गुण अरस कॉंग्रेसवासीच्या ध्यानात यावे यासाठी हा प्रपंच आहे. या पक्षाला जर पुढे राज्यकर्ता पक्ष व्हायचे असेल तर त्याने देवराज अरस यानाच अध्यक्ष म्हणून निवडण्याची नितांत गरज आहे. कारण सुबय्यासारखी रत्ने पदरी असल्याखेरीज मुख्यमंत्री निधीला पैसा उपलब्ध होणार कसा आणि गरिबाची कामे मुख्यमंत्री करणार कशी?

मोले सुकृत करू नये

मोले पुजारी होऊं नये
दिल्हा तरी घेऊं नये
इनाम, निस्पृहे !

छत्रपती शिवाजीमहाराज हातात भवानी तलवार घेऊन राज्य करीत होते, तेव्हा रामदास असे लोकाना शिकवीत होते. त्या वेळेची साक्षरता लक्षात घेता व त्या वेळी रेडिओ, टी. व्ही. नव्हता ही गोष्ट विचारात घेता हे कोणाला कळत होते आणि कळून किती तसे वागत होते कोणास ठाऊक ! आता तर जमाना बदलला आहे. भवानी गायब आहे. छत्रपतीचे नुसते पुतळे वाढत आहेत... आणि राजकारणात कोल्ह्याची गर्दी आहे.

आता हे इंदिरा कॉंग्रेसचे श्री. कोल्हे काय म्हणतात पहा ! कोपरगावला आ. शंकरराव कोल्हे यांनी स्पष्ट सांगितले–

'पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहातील अशांनाच संजय गांधी निराधार योजनेखाली मदत देण्यात येईल. इतराना योजनेचा यत्किंचितही फायदा दिला जाणार नाही.'
[ सकाळ ९–४–८१ ]

यानंतर त्यांनी ५४००० रुपये वाटले. प्रत्येक निराधाराला श्री. कोल्हे बहुधा बजावीत होते–

'पैसे हवेत ना ? इंदिरा गांधी की जय म्हण आणि मग हात पुढे कर !'

पुढे भाषणात कोल्हे यांनी तंबी दिली–

'या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्यांची किंवा लाच घेणाऱ्यांची आम्ही गय करणार नाही !'

नाडलेल्याना समारंभपूर्वक लाच वाटप करणाऱ्या चालू राज्यकर्त्यांशी मुकाबला करण्यासाठी किती जबर ताकदीचा पक्षाध्यक्ष हवा याचा सुज्ञानी विचार करावा. 'लाच वाटताना देखील लाच घेणाऱ्याची गय केली जाणार नाही,' अशी तंबी द्यायला किती बरे मनोधैर्य लागते ? अशा राज्यकर्त्यांना नामोहरम करण्यासाठी देवराज अरस हेच सर्वतोपरी लायक वाटतात. देवराज अरस हे इसापनीतीतील आणि राजनीतीतील सर्व कोल्ह्यांना भारी ठरतील, याबद्दल आमच्या मनात शंका नाही.

एकदा का देवराज अरस, अरस कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले की–

'साहेबास लोटांगणी जावे
नीचासारिखे व्हावे–'

हे राजकीय तत्त्वज्ञान मानणारे, समस्त जन अरस कॉंग्रेसमध्ये गर्दी करतील किंवा रागावून इंदिरा कॉंग्रेसमध्येच जातील ही या जीर्ण पांढऱ्या टोपीवरील काळी रेघ आहे !

–ग्यानबा

# एकाधिकारशाहीला विरोध

वा. दा. रानडे

राजकीय पक्षाना आपले ठाम बनलेले ग्रह व आग्रह सोडून व्यापक दृष्टिकोन स्वीकारताच येणार नाही का ? मार्क्सवादी व भाजपच्या नेत्यांनी गेल्या काही दिवसांत सहकार्याच्या प्रश्नावर ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत त्यातून हा प्रश्न उपस्थित होतो. मुख्य प्रश्न आहे इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीविरुद्ध एकत्र लढा देण्याचा. अशा लढ्यातून भाजपला वगळता येणार नाही अशी भूमिका मार्क्सवादी पक्षाच्या पोलिटब्यूरोने घेतली आणि या बैठकीनंतर नंबुद्रिपाद यांनी पत्रकारांशी बोलताना याच भूमिकेच्या पायावर भाजपला सहकार्याचे आवाहन केले. पण दोन्ही पक्षात त्यासंबंधी संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. त्या लक्षात घेता या मार्गावर फारशी प्रगती होण्याची शक्यता दिसत नाही.

मार्क्सवादी पक्षाने १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाबाबत जी भूमिका घेतली होती त्याच भूमिकेवर तो पक्ष पुन्हा येऊ पहात आहे जनता पक्षाची धोरणे व कार्यक्रमावर उजव्या गटांचा प्रभाव आहे असे त्या वेळीही मार्क्सवाद्याना वाटत होते. तरीसुद्धा देशावर इंदिरा गांधींची एकाधिकारशाही पुन्हा यायला नको असेल तर सर्व इंदिराविरोधकांनी एकत्र यायला हवे हे त्याना मान्य होते. त्या वेळी जनता पक्षातल्या जनसंघाशी सहकार्य त्याना खटकत नव्हते; पण नंतर हे धोरण त्यानी बदलले. जनसंघाला वगळूनही बाकी इंदिराविरोधी गट सत्ता हाती टिकवू शकतील किंवा मुदतपूर्व निवडणुका झाल्यावर सत्ता पुन्हा मिळवू शकतील असा अंदाज त्यानी बांधला, तो मात्र चुकला. विरोधी शक्तींमध्ये फाटाफूट झाली आणि इंदिरा गांधींना पुन्हा सत्तेवर येण्याची संधी मिळाली पश्चिम बंगाल व केरळमध्ये राष्ट्रपति-राजवट येऊन आपली सत्ता जाण्याचा धोका दिसू लागला तेव्हा मार्क्सवादी जागे झाले !' इंदिराविरोधाला १९७७ सारखी धार येऊ नये, विरोधी पक्ष विस्कळित रहावेत म्हणून त्यांचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी मार्क्सवादी राजवटीविरुद्ध विरोधी पक्षानी एकत्र येऊन आंदोलन करावे असे प्रयत्न इंदिरा कॉंग्रेस समर्थकानी सुरू केले व त्याची पहिली पायरी म्हणून दोन्ही कॉंग्रेस पक्षांनी एकत्र येण्याचे ठरविले आहे, असे पश्चिम बंगालमधील आपल्या एका खासदाराकरवी घोषित केले. आमच्याशी या प्रश्नावर बोलणी झालेली नाहीत. आम्ही काहीही निर्णय घेतलेला नाही असा अरसकॉंग्रेसच्या नेत्यानी खुलासा केला. प्रियरंजनदास मुनशी या प्रश्नावर बोलणी करीत आहेत असा उल्लेख त्या खासदाराने केला होता; पण मुनशींनी स्वत. याबाबत काहीही निवेदन केले नाही. अरस कॉंग्रेस गोटात चलविचल व्हावी, त्याचे काही नेते आपल्या बाजूला ओढता आले तर पहावेत हा त्यामागे उद्देश होता. त्याला फारसे यश आलेले दिसत नाही. मार्क्सवादी राजवटीविरुद्ध बिगरमार्क्सवादी गट एकत्र येऊन आंदोलन करण्याचीही शक्यता दिसत नाही. इंदिरा कॉंग्रेसला असे आंदोलन हवे आहे; पण त्यातून इंदिरा कॉंग्रेसचेच बळ वाढेल याची इतर विरोधी पक्षांना जाणीव होऊ लागली आहे. काही राज्यांत तरी विरोधी पक्षाची सरकारे असल्याने इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीस काही प्रमाणात तरी शह बसत आहे तेव्हा ही सरकारे टिकविली पाहिजेत. आंदोलन करून ती पाडणे लोकशाही तत्त्वाच्या दृष्टीनेही बरोबर आहे ही जाणीव मार्क्सवाद्याची धोरणे पसंत नसलेल्या विरोधी पक्षामध्येही वाढत आहे. मार्क्सवाद्याच्या धोरणाना आमचा विरोध असला तरी त्याची सरकारे पाडण्याच्या आंदोलनाला आम्ही पाठिंबा

देणार नाही असे वाजपेयींनी व भाजपच्या इतर नेत्यांनीही जाहीर केले आहे. निवडणुकीत बहुमत मिळवून सत्तेवर आलेले सरकार त्याची मुदत संपेपर्यंत अधिकारावर राहिले पाहिजे अशी भाजपची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. भाजपच्या या भूमिकेमुळेच त्यांच्याबद्दलचा आपला दृष्टिकोन बदलावा आणि एकाधिकारशाही-विरोधी लढ्यात त्यालाही आपल्याबरोबर सहभागी करावे असे मार्क्सवाद्यांना वाटू लागले असावे.

नम्बुद्रिपाद यांच्या सूचनेचे वाजपेयींनी स्वागत केले. 'आम्ही सहकार्याला नेहमीच तयार होतो. तुम्हीच आम्हाला झिडकारले.' अशा शब्दात त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली; पण वाजपेयींचा हा व्यापक दृष्टिकोन भाजपच्या इतर नेत्यामध्ये दिसून आला नाही, मार्क्सवाद्यांशी कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही प्रकारच्या सहकार्यास त्यांनी विरोध दर्शविला. कोचीन येथे भाजपच्या कार्यकारिणीच्या बैठकीत या प्रश्नावर चर्चा झाली आणि मार्क्सवाद्यांशी सहकार्याची सूचना एकमताने फेटाळण्यात आली. वाजपेयी अनुकूल होते; पण सर्वांचाच विरोध दिसल्यावर त्यांनीही आपल्या मताचा आग्रह धरला नाही असे काही बातम्यात म्हटले आहे. भाजपमध्ये रा. स्व. संघवाल्यांचा कट्टर गट आणि वाजपेयींचा उदारमतवादी गट असे दोन प्रवाह आहेत; पण या प्रश्नावर कट्टर गटाची सरशी झाली. मार्क्सवादी पक्षाला आमचे सहकार्य हवे असेल तर त्यांनी केरळमधील राजकीय खुनाचे सत्र थांबवावे अशी अट भाजपच्या एका नेत्याने घातली. त्यावर मार्क्सवादी पक्षाच्या पोलिट ब्यूरोने असा खुलासा केला की आम्ही भाजपचे सहकार्य मागितलेलेच नाही. दोन्ही पक्षाची विचारप्रणाली, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नावरील भूमिका यात खूप अंतर असताना सहकार्य शक्यच नाही. एकाधिकारशाहीविरुद्ध करावयाच्या लढ्यात भाजपला वगळावयाचे नाही एवढेच पोलिट-ब्यूरोच्या ठरावात म्हटले आहे. याबाबतीत बिनशर्त सहकार्याची अपेक्षा आम्ही केली असता भा. ज. प.चे नेते मात्र अटी घालत आहेत.

पण मार्क्सवादी नेते तरी अटी सोडायला कोठे तयार आहेत? भाजपने रा. स्व. संघाशी आपले संबंध स्पष्ट केले पाहिजेत अशी अट केरळचे मुख्यमंत्री नयनार यांनी या सहकार्यासाठी घातली आहे. मग भाजप नेत्यांनी अटी घातल्या म्हणून मार्क्सवादी नेते त्यांना कसा दोष देऊ शकतात? पोलिटब्यूरोच्या ठरावात काही अट घातलेली नसता तुम्ही कशी घालता असा प्रश्न एका वार्ताहराने विचारला असता नयनार म्हणाले, 'मी फक्त केरळ-पुरते बोलत आहे.' म्हणजे या प्रश्नावर मार्क्सवाद्यांचे अखिल भारतीय धोरण वेगळे आणि राज्यपातळीवरील धोरण वेगळे अशी परिस्थिती दिसते. 'केरळमध्ये एकाधिकारशाहीविरुद्ध लढतानासुद्धा भाजपचे सहकार्य आम्ही घेणार नाही' असे नयनार यांनी स्पष्टच सांगितले. या भूमिका लक्षात घेता मार्क्सवाद्यांनी मांडलेल्या या प्रस्तावाची दोन्ही पक्षातील कट्टर गट आपला दृष्टिकोन बदलण्यास तयार नसल्याने—काहीच प्रगती होण्याची शक्यता दिसत नाही. तरीसुद्धा एकाधिकार-शाहीविरोधी प्रभावी आघाडी उभारण्यासाठी प्रयत्न चालू ठेवायलाच हवेत.

□


## 'अक्षर दिवाळी' – १९८०

१९८० च्या दिवाळी अंकातील कथा, कादंबरिका, कविता व्यंगचित्रे, ललित व वैचारिक लेख असे निवडक साहित्य

संपादक मंडळ—य. दि. फडके, स. शि. भावे, आनंद यादव, प्र. ना. परांजपे, दिनकर गांगल

दि. १६–५–८१ रोजी प्रकाशित होणार.

डेमी आकार, सुमारे ४०० पृष्ठे, मूळ किंमत रु. ३२/–

मर्यादित प्रतींसाठी घरपोच सवलतीची किंमत रु. २२/–

११ प्रती मागविणारास नजिकच्या एस्. टी. अगर रेल्वेस्थानकापर्यंतच्या वाहतूक खर्चासह रु. २४२/– ऐवजी रु. २००/– फक्त

ड्राफ्ट अगर मनीऑर्डरने आजच रक्कम धाडा.

**विश्वकर्मा साहित्यालय** | २०३५ सदाशिव, टिळक पथ, पारिजातजवळ, पुणे ४११ ०३०.

## उत्तरमीमांसा : ३ :

स. शि. भावे

# महाराष्ट्र आणि महाराष्ट्रधर्म

यंदाचा महाराष्ट्रदिन हा बाविसावा दिन. नव्या महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला एकवीस वर्षे पुरी झाली. मतदानाचे हे वय. या टप्प्याशी थाबून थोडा विचार करायला हरकत नाही.

एकवीस वर्षे गेली. त्या दिवशी जी मुले जन्मली असतील ती आज एकवीस वर्षे पुरी करीत आहेत. त्या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व ज्यांना स्वानुभवाने माहीत नाही अशी ही पिढी.

पण ज्यानी तो दिवस अनुभवला होता, त्या दिवसाआधीची पाचसहा वर्षे अनुभवली होती, त्यांना आज पुन्हा ते सारे आठवत असेल. पाच कोटी मराठयानी एकदिलाने जो दीर्घ लढा दिला, जी किंमत मोजली ते सारे आठवत असेल.

फाजल अली आयोग. शिवाजीपार्कवरील पाच लाखाची प्रचंड सभा. दिल्लीस पहाटफेरीत शकरराव देवाना अकस्मात स्फुरलेले द्वैभाषिकाचे स्वप्न. मुबई स्वतंत्र ठेवण्याचे प्रयत्न. 'सीडी' (चिंतामणराव) देशमुखाचा राजीनामा आणि संसदेसमोर त्यानी केलेले निवेदन. एकशेपाच हुतात्मे. आचार्य अत्र्यांचा शापवाणी उच्चारलेला अति तेजस्वी अग्रलेख. छप्पन सालचे छोटे द्वैभाषिक. सत्तावन्नमध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीने मिळविलेले भरघोस यश. बाहेर कडवा विरोध सोसून आतून चाललेले यशवंतरावाचे, काकासाहेब गाडगीळाचे प्रयत्न. राष्ट्रीय नेत्याच्या सभाना जनता कर्फ्यू. प्रतापगडाच्या रस्त्यावर दुतर्फा केलेली निदर्शने. 'भारतरत्न' अण्णासाहेब कर्व्यांनी पडितजीसमोर प्रकट केलेली 'संयुक्त महाराष्ट्रा'ची इच्छा. त्या वेळच्या कॉंग्रेस अध्यक्षाना महाराष्ट्राची मागणी पटविण्यात आलेले यश. १ मे ६० रोजी पंडितजीच्या हस्ते आलेला मगलकलश. लता मंगेकरांनी जीव ओतून गायिलेले महाराष्ट्रगीत.

सारा पट अजूनही ताजा आहे. कल्पनाचक्षूंनी आज तो अनुभवताना मनात दोन प्रश्न उभे राहतात. अर्धे तप हा लढा कशासाठी दिला ? आणि ज्यासाठी दिला ते सारे मिळाले का ? उभे राहिले का ?

पहिली आकाक्षा अशी होती की इथेतिथे विखुरलेला मराठी प्रदेश एक व्हावा. आज एकवीस वर्षांनीही हे झालेले नाही. मुत्सद्देगिरीच्या युक्तिवादाने डाग तेव्हाच दान केला होता. (गुजरातच्या राजधानीसाठी काही कोट रुपयेही दान केले होते.) बेळगाव आणि खानापूरचा परिसर आजही महाराष्ट्रात आलेला नाही.

अमेरिकेने व्हिएतनामचे युद्ध जसे विनाकारण तीस वर्षे घोळवले तसा सीमावाद गेली एकवीस वर्षे घोळवला जातो आहे. दोन्ही राज्यातील त्या त्या वेळची सरकारे, केंद्रातील त्या त्या वेळची सरकारे, आधी सयुक्त महाराष्ट्र समितीतील व नंतर महाराष्ट्र एकीकरण समितीतील त्या त्या वेळचे नेतृत्व या वरिष्ठ राजकारण्यांच्या राजकीय सोयीगैरसोयीनुसार या प्रश्नाचा वापर अनेक वेळा, प्रसंगोपात्त झाला; पण मूळ प्रश्नाच्या रास्त सोडवणुकीकडे एकही पाऊल पडलेले दिसत नाही. आज आता 'विशाल गोमंतका'चा पर्याय आला आहे.

या पर्यायाचे प्रयोजन कोणते ? मराठी मुलूख महाराष्ट्रात यावा हे की तो काही केल्या अन्य भाषिक राज्यात जाऊ नये हे ? बरे, 'विशाल गोमंतक' हा मराठी भाषिकच होणार अशा आशेने हा पर्याय सुचविला म्हणावे तर मग स्वतंत्र विदर्भाला कोणत्या भूमिकेवरून विरोध करणार ?

दोन मोठया भाषिकाचे एक राज्य असायला हरकत नाही—हेच ते तत्त्व आहे ना ? हे तत्त्व रास्त दिसते. हिंदी भाषिकाची पाच राज्ये आहेतच. मग सहा कोटी मराठी लोकांची दोन व तीन राज्ये असली तर तत्त्वत: विरोध असण्याचे कारण नाही.

साठ साली महाराष्ट्र झाला त्या वेळची दुसरी आकाक्षा या निमित्ताने डोळघापुढे येते. महाराष्ट्राच्या सर्व विभागांचा समतोल विकास महाराष्ट्रनिर्मितीने साधू शकेल ही ती आकाक्षा.

आज परिस्थिती काय आहे ? नागपूर करार ज्या राजकीय व सामाजिक समतोलासाठी केला होता, त्यापैकी राजकीय समतोलही अद्यापी साधलेला नाही. मग सामाजिक समतोल दूरच राहिला. नागपूर करारातच मराठवाड्याकडे दुर्लक्ष झालेले आहे अशी मराठवाड्याची तक्रार होती. ही तक्रार आजही कायम आहे. तिची दखल घेऊन तर मुख्यमंत्र्याना आपला तेहतीस कलमी कार्यक्रम औरंगाबादला जाहीर करावा लागला.

कोकणपट्टीचा मागासलेपणा दूर करण्यासाठी तर कोकणपट्टीच्या मुख्यमंत्र्यानी खास कंबर कसली आहे, हे योग्यच आहे; पण यातून एकत्रितपणे जे चित्र उभे राहते ते असे की, गेल्या एकवीस वर्षांत विदर्भ, मराठवाडा आणि कोकण उपेक्षितच राहिले.

म्हणजे पश्चिम महाराष्ट्राचाच फक्त विकास झाला असे म्हणावे लागते; पण तेही पूर्णपणे खरे नाही असे माननीय वसंतदादांनी नुकतेच जाहीर केले आहे.

मग विकास झाला तरी कोठल्या भागाचा ? की कोणत्याच भागाचा झाला नाही ? (हेच बहुधा खरे असावे. एकच उदाहरण पहा. साधारणपणे मंत्र्यांचे गाव, त्याचा परिसर लवकर विकसित होतो असे मानले जाते; पण कऱ्हाडचेच पहा. शेहेचाळीसपासून यशवंतराव मंत्रिपदी होते; पण कऱ्हाडमध्ये भुयारीगटारयोजना आली ती केवळ दोन वर्षांपूर्वी )

महाराष्ट्रनिर्मितीच्या क्षणी आणखी एक आकाक्षा तीव्रतेने होती, तो मराठी भाषा आणि संस्कृती याच्या परिवर्धनाची आणि विकासाची. हे परिवर्धन झाले की नाही आणि विकास साधला की नाही, याविषयी

नन्नाचाच पाढा सर्वत्र आहे. महाराष्ट्राच्या शासनाचे मराठीकरण पराकोटीने रेंगाळले आहे हे खुद्द शासनानेच मान्य केले आहे आणि भाषा-वर्षात (सन १९७८–७९) मराठीकरणाचे प्रमाण निदान ८० टक्के वाढावे असे प्रयत्न करण्याचे ठरविले होते. हे प्रमाण किती वाढले याची आकडेवारी उपलब्ध नाही. तथापि ते वाढलेले नाही असाच सगळीकडे अनुभव येतो.

ज्ञानभाषा, समाजभाषा आणि शासनभाषा म्हणून मराठीचा दर्जा विकसित होण्याची गोष्ट दूरच राहिली; पण छपन्न साली होती तेवढी मराठी भाषेसंबंधीची आपुलकी किंवा तेवढा मराठीचा अभिमान आज शिल्लक आहे असे म्हणण्यात सत्यापेक्षा धार्ष्ट्याचाच भाग अधिक म्हणावा लागेल.

महाराष्ट्राच्या सर्व विद्यापीठांत मराठी विषयाला मानाचे, महत्त्वाचे स्थान नाही. एकाही विद्यापीठात, विद्यापीठ अनुदान मंडळाला अभिप्रेत असे प्रगत अध्ययनकेंद्र मराठीसाठी नाही. साक्षरता वाढली. सुशिक्षितता वाढली. भारतात साक्षरतेचे प्रमाण महाराष्ट्रात फेरळखालोखाल आहे; पण स्वतः विकत घेऊन पुस्तके वाचणारांचे प्रमाण मात्र वाढलेले नाही. मुख्य म्हणजे मराठीसंबंधीची आस्था मराठी भाषिक विद्वानात दिसत नाही.

एवंच, ज्या ज्या आकांक्षा महाराष्ट्र राज्य व्हावे, 'झालाच पाहिजे' असे म्हणताना मनाशी बाळगल्या होत्या, त्या त्या विफल झाल्याचेच पाहावे लागत आहे.

आज प्रश्न असा पडतो की, या आकांक्षा आमच्या मनात खरोखरीच वसत होत्या काय? आम्हाला समस्त मराठी लोकांचे एकछत्री राज्य हवे होते ते कशासाठी? मराठी भाषेबरोबरच, मराठी संस्कृतीचे परिवर्धन व्हावे म्हणून महाराष्ट्र राज्य व्हावे असे एकवीस वर्षांपूर्वी म्हटले होते. कोणती मराठी संस्कृती आम्हाला अभिप्रेत होती?

खरेच. संयुक्त महाराष्ट्राची कैफियत ज्यांनी तयार केली ते भाऊसाहेब हिरे व धनंजयराव गाडगीळ यांना कोणती मराठी संस्कृती अभिप्रेत होती? अर्थमंत्रीपदाचा बाणेदारपणाने राजीनामा देणाऱ्या चिंतामणराव देशमुखांना कोणती मराठी संस्कृती अभिप्रेत होती? एकशेपाच मराठी लोक हुतात्मे झाले. इतर असंख्य लोक या चळवळीत भणंग झाले. कोट्यवधी मराठी माणसे या मराठी राज्यासाठी पेटून उठली होती. या साऱ्यांना कोणती मराठी संस्कृती अभिप्रेत होती? कोणत्या संस्कृतीच्या स्वप्नासाठी या साऱ्यांनी आपली सुख-सुरक्षितता कुर्बान केली?

आज एकवीस वर्षांनी या प्रश्नाचा जाब आपण काय देणार आहोत? मराठी राज्याचे धुरीण या प्रश्नाचा जाब काय देणार आहेत?

एक साधा प्रश्न: मराठी ही ज्याची मातृभाषा आहे अशा विद्यार्थ्याला जगातील सारे अद्ययावत्, सारे उच्चतम ज्ञान मराठीतच मिळवता येईल अशी समृद्धी आम्ही गेल्या एकवीस वर्षांत निर्माण केली आहे काय? होय, असे या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही, ही वस्तुस्थिती किती लाजिरवाणी आहे!

आणखी एक साधा, पण कदाचित् अती अवघड प्रश्न. अशी कोणती ती मराठी संस्कृती, जिच्यासाठी आपल्याला वेगळा महाराष्ट्र प्रांत हवाच होता? जुन्या मुंबई प्रांतापेक्षा किंवा जुन्या द्वैभाषिकापेक्षा, नवे महाराष्ट्र राज्य कोणत्या बाबतीत वेगळे होते? गेल्या एकवीस वर्षांत, भारताच्या इतर प्रांतांपेक्षा कोणती वेगळी कामगिरी महाराष्ट्राने करून दाखविली? जिला आपण महाराष्ट्राची म्हणून वेगळी अस्मिता म्हणू शकू, अशी कोणती वेगळीक आपण दाखविली?

इतिहासकाळात अशी वेगळी अस्मिता दिसते.

भारतात सर्वत्र ज्या वेळी मधुराभक्तीचा बडिवार चालू होता त्या वेळी मराठी वारकरी पंथ विठाईमाउली म्हणून देव-भक्ताचे नाते आई मुलाचे म्हणून अनुभवण्यास सांगत होता. भक्तीतील मातृवात्सल्याचा हा उदात्तपणा, हा मराठी संस्कृतीच्या परंपरेचा वेगळेपणा होय.

भारतात इतरत्र जेव्हा दिल्लीच्या सत्तेला लोटांगणे घातली जात होती, तेव्हा महाराष्ट्रातच फक्त प्रतिकाराची कडवी तयारी केली जात होती. १६८९ ते १७०७ या उण्यापुऱ्या वीस वर्षांत, निर्नायकी परिस्थिती असताना मराठी सामान्य जनतेने ही अस्मिता आत्मप्रत्ययाने रक्षण केली होती.

'महाराष्ट्र-धर्म' ही प्रादेशिक निष्ठा महाराष्ट्रातच प्रथम उच्चारली गेली, जोपासली गेली. पंथनिष्ठा, धर्मनिष्ठा, गुरुनिष्ठा, राजनिष्ठा–अशा अनेक मध्ययुगीन निष्ठा, जगात जशा इतरत्र तशा भारतातही होत्या; पण प्रादेशिक राष्ट्रनिष्ठेचा हा हुंकार, सतराव्या शतकात महाराष्ट्रात घुमला तो भारतातच नव्हे तर जगातही प्रथम घुमलेला 'सेक्युलर' निष्ठेचा हुंकार असे म्हणावे लागेल!

एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनाची परंपरा खऱ्या बुद्धिवादाने महाराष्ट्रानेच जोपासली. लोकहितवादी, रानडे, विष्णुशास्त्री, टिळक. आगरकर, कर्वे, महात्मा फुले, छत्रपती शाहूमहाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, धर्मानंद कोसंबी, राजवाडे, विष्णुबावा ब्रह्मचारी, वामन मल्हार, डॉ. केतकर, सावरकर–अशी तेजस्वी समाजविचारवंतांची परंपरा आपल्याजवळच दिसते.

एकोणीसशेवीस सालापासून प्रथम स्वतंत्र महाराष्ट्र विद्यापीठ, नंतर संयुक्त महाराष्ट्र अशी क्रमाने आपण मागणी करीत गेलो तेव्हा मराठी संस्कृतीची आधी सांगितली ती आणि तशी वैशिष्ट्येच आपल्या नजरेसमोर होती. या वैशिष्ट्यांनी झालेल्या संस्कृतीचे परिवर्धन आपल्याला करायचे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ज्यांनी सर्वस्व वेचले त्यांना स्पष्टपणे सांगता आले नसते; पण त्यांच्या बलिदानामागे प्रेरणा होती ती याच संस्कृतीची होती याबद्दल शंका घेता येणार नाही.

ताडकन राजीनामे देऊन मोकळे होणारे चिंतामणराव देशमुख, धनंजयराव गाडगीळ यांची संस्कृती आज आहे का? गोखले अर्थशास्त्र संस्थेमार्फत मराठीच्या ज्ञानसमृद्धीचे मंदिर उभारणाऱ्या धनंजयरावांचा आदर्श आजच्या शिक्षण–संशोधन संस्थांसमोर आज आहे का? कर्मवीर भाऊराव पाटलांचा आदर्श ग्रामीण शिक्षणसंस्थांसमोर आहे का? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श आजच्या दलित चळवळीपुढे आहे काय?

आज बाविसावा महाराष्ट्रदिन. या निमित्ताने गेल्या एकवीस वर्षांचा ताळेबंद विचारासाठी घेतला आहे. हा ताळेबंद फारसा दिलासा देणारा आहे असे म्हणवत

नाही. या तुटीच्या ताळेबंदाची जबाबदारी कोणाची ?

ती अन्य कोणाचीही असो, ती सर्वसामान्य मराठी जनतेची नाही एवढे मात्र खरे आहे.

सर्वसामान्य मराठी जनता अत्यंत सुजाण आहे आणि तिने आपले अस्सल मराठपण कायम ठेवले आहे.

१९५२ पासूनच्या प्रत्येक निवडणुकीत या मराठी जनतेने अत्यंत शहाणपणाने आणि चाणाक्षपणाने आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. ५७ साली या जनतेने राज्य विधानसभेसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीला निवडून दिले तर केंद्रात कॉंग्रेसला निवडून दिले. या वेळी केंद्र व राज्य या दोन्हींसाठी एकाच वेळी मतदान करायचे होते, तरीही ही छाटणी जनतेने केली. ६७, ७७ आणि ८० या वेळीही जनतेने आपला ठोस चाणाक्षपणा दाखवला आहे.

गोव्याची चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, बासष्ट, पासष्ट व एकाहत्तर या वेळचे युद्धप्रयत्न, ७६–७७ ची मुक्ति-चळवळ आणि सध्याची शेतकरी आंदोलने–ज्या ज्या वेळी अस्सल निमित्त होते त्या त्या वेळी मराठी जनतेने मोठ्या ताकदीने स्वयंस्फूर्त उठाव केला आहे.

विद्यार्थी, प्राध्यापक, मजूर, अन्य संघटित वर्ग यांची आंदोलने महाराष्ट्रात, इतर राज्यांच्या तुलनेने, अजूनही शांततेने आणि विवेकानेच होत आहेत.

निरनिराळ्या विधायक चळवळींची उभारणी ही जनता सध्याही उत्साहाने आणि कार्यक्षमतेने करीत आहे.

जन-जीवनात ही जी अस्मिता व उभारी दिसत आहे तिचा प्रत्यय महाराष्ट्राच्या प्रशासनात, विद्याक्षेत्रात, इतर सांस्कृतिक संस्थांत का येत नाही ?

सर्वच पातळ्यांवरील मराठी नेतृत्वाने अंतर्मुख होऊन विचार करावा असा हा प्रश्न आहे. महाराष्ट्रधर्म जनतेच्या जीवनात दिसतो. नेत्यांच्या कार्यकर्तृत्वात तो का दिसत नाही ?

□

---

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ पश्चिम बंगालची घसरगुंडी !

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी विरोधी पक्षांचे शासन असलेल्या राज्यसरकारवर नाराज आहेत. परवाच त्यांनी श्रीनगरमध्ये सांगून टाकले की, केंद्र सरकार मनात आणील तर अर्ध्या तासात, राज्यामधील विरोधी पक्षांचे सरकार बरखास्त करू शकेल. मात्र तसे करण्याचा आपला विचार नाही अशी पुस्तीही त्यांनी लगोलग जोडली. पंतप्रधानांच्या या विधानावर तिखट प्रतिक्रिया उमटल्या. पं. बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसु कासावीस झाले. इंदिराजींविरुद्ध तमाम विरोधी पक्षांनी आघाडी उघडली पाहिजे असे आवाहन त्यांनी नवी दिल्ली येथे येऊन केले. अशा आघाडीमध्ये भा. ज. प. सह सर्व पक्षांनी सामील व्हावे अशी त्यांनी जवळजवळ विनवणी केली आणि त्याचबरोबर इंदिराजींवर त्या हुकुमशाही वृत्तीच्या असल्याचा आरोपही केला. प. बंगालमध्ये परिस्थिती काही फारशी समाधानकारक नाही. सर्व आलबेल असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देत असले तरी कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत परिस्थिती गंभीर आहे. इंदिरा कॉंग्रेसने याच गोष्टीचा लाभ घ्यायचा असे ठरवून कलकत्त्यामध्ये जोरदार निदर्शने घडवून आणली आणि त्याच वेळी राज्यामधील विद्यमान सरकार कसे अकार्यक्षम आहे याची नोंद असलेली प्रचारपत्रके वाटण्यात आली. आपली प्रतिमा उजळ आहे आणि शासन कार्यक्षम असून अनेक आघाड्यांवर या सरकारने कसे यश मिळवले आहे, याचा तपशील शासनामार्फत प्रसिद्ध करण्यात येत असला तरी अनेक महत्त्वाच्या बाबतीत बसु यांचे सरकार फारसे काही करू शकलेले नाही. औद्योगिक आघाडीवर तर गेल्या काही वर्षांत आणि विशेषत विद्यमान सरकार अधिकारावर आल्यापासून जोरदार घसरगुंडीच झालेली दिसते.

सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगधंद्यांसाठी केन्द्राकडून राज्यांना जी मदत दिली जाते त्या मदतीचा मोठा वाटा प. बंगालच्या वाट्याला आला आहे. ३१ मार्च १९८१ अखेर केंद्र शासनाने राज्यांना उद्योगधंद्यामधील गुंतवणुकीसाठी १८.१६१ कोटी रुपये एवढ्या रकमेचे साहाय्य दिले. राज्यांना दिलेल्या रकमांच्या आधारे क्रमवारी पाहिली तर प. बंगालचा तिसरा क्रमांक लागतो. सर्वांत जास्त साहाय्य बिहारला मिळाले असून त्याखालोखाल मध्यप्रदेशाचा नंबर लागतो. प. बंगालला १,५४० कोटी रुपयांचे सहाय्य देण्यात आले असून त्याचा क्रमांक तिसरा लागतो. टक्केवारीच्या प्रमाणात बोलायचे झाले तर या बाबतीत केंद्राकडून खर्ची पडलेल्या एकूण रकमेच्या ८.४८ टक्के रक्कम विरोधी पक्षाचे शासन असलेल्या प. बंगालच्या वाट्याला आली आहे. मदत देण्याच्या बाबतीत विरोधी पक्षाचे शासन असलेल्या राज्यांच्या बाबतीत आपल्या मनात दुजाभाव नाही असे जे इंदिराजी सांगतात ते निदान या बाबतीत तरी खरे आहे. प. बंगालच्या औद्योगिक क्षेत्रामधील परिस्थिती समाधानकारक नसूनही इतकी मदत दिली गेली हे विशेष मानले पाहिजे. या राज्यामधील औद्योगिक क्षेत्राचा एक आढावा अलीकडेच प्रसिद्ध झालेला आहे. त्यामध्ये असे स्वच्छ नमूद करण्यात आले आहे की, ' औद्योगिक क्षेत्रामधील अशांतता बसू सरकार सत्तेवर आल्यापासून वाढली असून कामगारांच्या कार्यक्षमतेमध्ये लक्षणीय घट झाली आहे. सत्तास्थानी असलेले सरकार हे आपले सरकार आहे अशी कामगारांची भावना असल्याने आपण कार्यक्षमता दाखवली नाही तरी हे सरकार आपलाच पाठपुरावा करील असा विश्वास कामगारांना वाटतो. याउलट शासनाकडून आपल्याला न्याय मिळणार नाही असे खाजगी क्षेत्रामधील उद्योगपतींना वाटत असल्याने नवीन उद्योगधंदे सुरू करणे अथवा विद्यमान उद्योगधंद्यांची वृद्धी करणे या बाबतीत उद्योगपती उदासीन असल्याचे दिसून येते.

यापूर्वीही डाव्या आघाडीचे सरकार असताना औद्योगिक अशांतते-

मुळे दुर्गापूर प्रकल्पाच्या विकासयोजना बाजुला ठेवाव्या लागल्या. औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणावर नियमित सतत होणाऱ्या वीजपुरवठ्यावर अवलंबून असतो. आणि वीजपुरवठ्याची प. बंगालमधील परिस्थिती तर चिंताजनक आहे आणि त्यात सुधारणा होण्याची लक्षणे नाहीत. स्वाभाविकपणे आयुर्विमा महामंडळ, तसेच विविध राष्ट्रीय बँका यांनी प. बंगालमध्ये मोठ्या रकमा गुंतवण्याबाबत उदासीन वृत्ती दाखवली आहे. औद्योगिक आघाडीवर ही चिंताजनक परिस्थिती आहे त्याची शासनाला जाणीव नाही असे नाही. पण राजकीय हित लक्षात घेऊनच प्रत्येक निर्णय केला जात असल्याने त्याचे अनेक विपरीत परिणाम पहावयास मिळतात. १९६५ नंतर राज्यांमध्ये आघाडी सरकारे आली. १९७२ ते ७७ या काळात कांग्रेसचे शासन होते आणि त्यानंतर डाव्या कम्युनिस्टांचे वर्चस्व सतत वाढत जाऊन सध्या त्यांच्या एकट्याच्या ताकदीवर राज्य करू शकेल असे सामर्थ्यशाली सरकार सत्तेवर आहे. सतत होणाऱ्या सत्तांतरामुळे जी राजकीय अस्थिरता आली. त्याचाही विपरीत परिणाम औद्योगिक क्षेत्रावर झालेला दिसतो.

राज्यावर आलेल्या प्रत्येक शासनाने आपली सत्ता बळकट करण्यावर जास्तीत जास्त लक्ष केन्द्रित केल्याचे दिसून येते. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून औद्योगिक क्षेत्रामधील नेमणुका करतानाही राजकीय विचाराला प्राधान्य देण्यात येऊन झपाट्याने अनेक अपात्र व्यक्तींच्या नेमणुका करण्यात आल्या. उद्योगधंद्याचे पुरेसे ज्ञान, आर्थिक प्रश्नांची समज, कामगार-प्रश्न हाताळण्याचे कौशल्य आणि उद्योगधंदा यशस्वी करून दाखवण्याबाबतचा आत्मविश्वास या कसोट्यांवर अशा नेमणुका होणे जरूर असते; पण सध्याचे सरकार या कोणत्याही गोष्टी विचारात न घेता 'स्वपक्षाचे हित' ही एकमात्र प्रमुख कसोटी लक्षात घेऊन औद्योगिक क्षेत्रामधील नेमणुका करण्यात दंग असलेले दिसते. जून १९७७ मध्ये सत्ताग्रहण केल्यापासून या शासनाने प्रत्येक महत्त्वाच्या क्षेत्रात स्वपक्षीयांचा भरणा करण्याची जणु मोहिमच उघडलेली दिसते. राज्यशासनाचा अधिकार ज्या औद्योगिक संस्थांबाबत चालू शकतो तेथील नेमणुका राजकीय विचार डोळ्यांसमोर ठेवून केलेल्या दिसतात. या शासनाने गेल्या चार वर्षांत औद्योगिक क्षेत्रात एकूण ६८७ महत्त्वपूर्ण नेमणुका केल्या. त्यापैकी पक्षाशी प्रत्यक्ष संबंधित असणाऱ्या आणि डाव्या कम्युनिस्ट पक्षाबद्दल उघडउघड सहानुभूती असलेल्या व्यक्ती ६१२ आहेत. यावरून नेमणुकीबाबत कोणते धोरण ठेवले जाते हे पुरेशा प्रमाणात स्पष्ट होते. स्वपक्षाचे हित ही एकमेव कसोटी लावून नेमणुका होतात हे लक्षात आल्याने ज्यांच्या नेमणुका झाल्या त्यांनीही काम करताना आपली पक्षनिष्ठा शासनाच्या लक्षात यावी अशा पद्धतीने काम करण्यास सुरुवात केली. खेरीज अशा नेमणुका करताना पात्रतेबाबतच्या अन्य आवश्यक कसोटींचा विचार न झाल्याने औद्योगिक क्षेत्रामधील व्यवस्थापनक्षेत्राचा बट्ट्याबोळ उडाला. आज औद्योगिक क्षेत्रामधील व्यवस्थापकीय विभागातील मंडळी राजकीय पुढाऱ्यांप्रमाणे वागताना दिसत आहेत.

डावे कम्युनिस्ट आपल्या कार्यक्षमतेचा अवाजवी टेंभा मिरवत असतात. या पक्षाची संघटना बळकट आहे. झटून काम करणारे कार्यकर्ते आहेत. स्वाभाविकपणे असा अंदाज होता की, या पक्षाचे शासन, किमानपक्षी भ्रष्टाचारी तरी असणार नाही; पण या बाबतीतही औद्योगिक क्षेत्रासह सर्वच आघाड्यांवरील अनुभव धक्कादायक आहेत. भ्रष्टाचार सर्वत्र बोकाळला आहे आणि विद्यमान शासन जे होत आहे ते पहात बसण्यापलीकडे फारसे काही करताना दिसत नाही. औद्योगिक क्षेत्राबाबतची आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे बाजारात येणाऱ्या मालाची गुणवत्ता उतरणीला लागली ही. गुणवत्ता पाहणाऱ्या अधिकाराच्या जागा, याबाबत अपात्र असणाऱ्या मंडळींना दिल्या गेल्याने, गुणवत्ता सुधारण्याची सुतराम शक्यता नाही. ज्यांची शैक्षणिक पात्रता पुरेशी नाही, ज्यांच्याजवळ तांत्रिक ज्ञान नाही आणि औद्योगिक उत्पादनाची गुणवत्ता टिकवून धरण्यासाठी जे मार्गदर्शन करावे लागते त्याची जाण ज्यांना नाही अशी मंडळी केवळ राजकीय विचार डोळ्यांसमोर ठेवून मोक्याच्या खुर्च्यांवर बसवण्यात आली, पण त्याचे चटका लावणारे परिणाम आता सर्वत्र दिसू लागले आहेत.

सध्या सत्तास्थानी असलेल्या डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या बलशाली संघटना राज्यामध्ये आहेत. सार्वजनिक क्षेत्रामधील उद्योगधंदे वाढवले पाहिजेत असा ओरडा या संघटना सतत करत असतात; परंतु सार्वजनिक क्षेत्रामध्ये असलेल्या उद्योगधंद्यांची कार्यक्षमता वाढावी, किमानपक्षी टिकून रहावी म्हणून या संघटना काही करत नाहीत. तसेच औद्योगिक उत्पादनाच्या गुणवत्तेबाबतही त्यांना फारशी फिकीर नाही. संघटनेच्या ताकदीवर कामगारांच्या आर्थिक मागण्या सतत पुढे रेटायच्या आणि संघटनेची व पक्षाची लोकप्रियता वाढवायची एवढे एकच धोरण या संघटनांकडून राबवले जात आहे. अर्थातच संप, टाळेबंदी यांचे पीकही उदंड आहे. १९७७ मध्ये कामाचे दिवस वाया जाण्याचे जे प्रमाण होते त्यामध्ये १९८१ अखेर जवळजवळ वीस टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. ७८–७९ मध्ये छोट्या उद्योगधंद्यांची संख्या १०,८४४ होती. गेल्या दोन वर्षांत त्यामध्ये फक्त सातशेऐंशी छोट्या उद्योगधंद्यांची भर पडली असून केवळ ६,५०० नवीन रोजगार उपलब्ध होऊ शकले आहेत. याउलट बेकारीचे प्रमाण झपाट्याने वाढत असून नोंदलेल्या बेकारांची संख्या २.६ दशलक्ष आहे.

औद्योगिक आघाडीवरील परिस्थिती चिंताजनक असली आणि अनेक भेडसावणारे प्रश्न समोर असले तरी बसू सरकारला त्याची फारशी फिकीर नाही. त्यांना चिंता आहे, आपण सत्तेवर कसे राहू याचीच आणि म्हणूनच कालपरवापर्यंत ज्या पक्षाचे नाव घेणेही त्यांना नको होते, त्या भारतीय जनता पक्षाचे सहकार्यही आज त्यांना हवे आहे. जनतेच्या दृष्टीने सत्तेवर कोण राहतो हे तितकेसे महत्त्वाचे नाही, तर सत्ताधारी पक्ष सत्ता कशा प्रकारे राबवतो हे जास्त महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने जनतेला दिलासा देईल असा पक्ष नजरेच्या टप्प्यात नाही. अशा वेळी विरोधी पक्षांची जबाबदारी जास्त मोठी आहे. ज्या राज्यात त्यांची सत्ता आहे त्या राज्यात तरी त्यांनी आशादायक कामगिरी करून दाखवणे जरूर आहे आणि या अपेक्षांच्या पार्श्वभूमीवर डाव्या कम्युनिस्टांच्या सरकारने प. बंगालच्या औद्योगिक आघाडीचे जे वांगे केले आहे ते जास्त त्रासदायक ठरणारे आहे.

## □ इंडियन एक्सप्रेस-संपादकीय विभाग

इंडियन एक्सप्रेस हे एक देशभर जाळे विणलेले जबरदस्त सामर्थ्यशाली दैनिक. अलीकडेच या दैनिकाच्या संपादकीय विभागामध्ये जे फेरबदल करण्यात आले ते चर्चेचा विषय ठरले आहेत. या पत्राच्या संपादकीय विभागावर एक्सप्रेस गटाचे प्रमुख संचालक रामनाथ गोएंका यांचे जातीने लक्ष असते. एक्सप्रेसचे मुख्य संपादक मुळगावकर यांनी प्रामुख्याने तब्येतीच्या कारणासाठी निवृत्ती स्वीकारल्यावर त्यांचे प्रमुख साहाय्यक अजित भट्टाचार्यजी यांची एक्सप्रेसचे मुख्य संपादक म्हणून नियुक्ती होईल अशी अपेक्षा होती. एक्सप्रेस न्यूज सर्व्हिसचे संपादक आणि मान्यताप्राप्त ज्येष्ठ पत्रकार कुलदीप नायर यांचे नावही या संदर्भात घेतले जात होते, पण वर्षानुवर्षे एक्सप्रेसची सेवा करणाऱ्या या मंडळींना डावलून 'दि स्टेट्स्मन' या दैनिकाचे माजी संपादक श्री. एस. निहालसिंग यांची एक्सप्रेसचे मुख्य संपादक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीची घोषणा झाल्यावर कुलदीप नायर आणि अजित भट्टाचार्यजी या दोघांनीही आपली नाराजी व्यक्त केली आणि लगालग आपल्या नोकरीचा राजिनामाही दिला.

या दोघांचाही राजीनामा ही फारशी गंभीर बाब न मानता, गोएंका यांनी या दोन्ही ज्येष्ठ पत्रकारांना त्यांच्या जबाबदारीतून मुक्त केले. या संदर्भामधील आपली भूमिका रामनाथ गोएंका यांनी अलीकडेच 'संडे' या साप्ताहिकाला दिलेल्या मुलाखतीमध्ये स्पष्ट केली आहे. त्यांचे म्हणणे असे की, ज्यांनी राजीनामे दिले ते दोन्ही ज्येष्ठ पत्रकार आपल्या क्षेत्रामध्ये चांगलेच पारंगत आहेत. कुलदीप नायर हे तर माझे स्नेही आहेत. तथापि एक्सप्रेससाठी नवीन मुख्य संपादक निवडताना अनुभवी परंतु तरुण व्यक्ती या पदासाठी निवडावा असे धोरण होते. अजित भट्टाचार्यजी केवळ एक वर्षात निवृत्त होणार होते आणि कुलदीप नायर यांची निवृत्तीही येऊन ठेपलली असल्याने मी या दोघांपैकी एकाची निवड करण्याबाबत फारसा आग्रही नव्हतो. त्यातही एक्सप्रेसच्या बाबतीत एक पथ्य आम्ही कटाक्षाने पाळले आहे. ते म्हणजे निवृत्त होणाऱ्या मुख्य संपादकाचा सल्ला आम्ही प्रमाणभूत मानतो आणि त्याच्याबरोबर मतभेद व्हावेत यासाठी तसेच काही जबरदस्त कारण असले तरच मी वेगळा विचार करतो, अन्यथा त्याचा सल्ला प्रमाण मानतो. फ्रँक मॉरेस निवृत्त झाले तेव्हा त्यांनी मुळगावकरांची निवड केली. आता मुळगावकर निवृत्त होत आहेत. त्यांना आम्ही काही नावे सुचवली. त्या नावांतून त्यांनी एस. निहालसिंग यांची निवड केली.

ज्या दोन पत्रकारांनी एक्सप्रेसमधील आपल्या नोकरीचा राजिनामा दिला त्या दोघांपैकी कुलदीप नायर यांची गोष्ट वेगळी होती. निहालसिंग हे पत्रकार म्हणून आपल्यानंतर आले. त्यात स्टेटसमनमध्ये काही काळ ते नायर यांच्या हाताखाली काम करत होते. स्वाभाविकपणे आता निहालसिंग यांच्या हाताखाली काम करणे कुलदीप नायर यांना मानवण्यासारखे नाही. खेरीज त्यांची निवृत्तीही येऊन ठेपली आहे. अजित भट्टाचार्यजी उत्तम पत्रकार आहेत. त्यांच्याही नावाचा विचार जरूर झाला होता; परंतु दीर्घकाळ जबाबदारी पेलू शकेल असा तरुण मुख्य संपादक असावा असे ठरल्यानंतर त्यांचे नाव मागे पडले. रामनाथ गोएंका पुढे म्हणतात, आम्ही ज्यांची निवड केली आहे त्या निहालसिंगांचे वय आज ५२ वर्षांचे आहे. त्यांच्या सेवेचा आठ वर्षे लाभ घेता येईल. ते स्टेटस्मनचे मुख्य संपादक होते आणि पत्रकार म्हणून त्यांचे चांगले नाव आहे. आमच्या दृष्टीने एवढे पुरेसे आहे.

एक्सप्रेसच्या काही आवृत्तींना स्थानिक संपादक नसल्याने मुख्य संपादकाला मोठी जबाबदारी उचलावी लागते. स्वाभाविकपणे दीर्घवेळ काम करण्याची क्षमता असलेल्या तरुण व जागरूक संपादकाची निवड करण्याची जबाबदारी आम्हाला पार पाडावी लागली.

गोएंकाशेठ जेवढे भासवतात तेवढे हे प्रकरण मात्र सरळ नाही. वर्तमानपत्र माझे आहे, तेव्हा 'मला हवी ती माणसे मी घेणार' हा मालकी तोरा निहालसिंग यांच्या निवडीमागे जरूर डोकावतो. कुलदीप नायर यांनी चंडीगढ आवृत्तीची जबाबदारी उचलावी असे त्यांना सुचवण्यात आले होते. तथापि त्यासाठी चंडीगढ येथे जाऊन काम करावे लागले असते. त्या गोष्टीला कुलदीपजींनी नकार दिला. त्याची किंमत त्यांना मोजावी लागली. संपादकीय विभागावर शेठजींचे जातीने लक्ष असते आणि संपादकीय विभागाच्या दुय्यम फळीमध्येही त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वारंवार बदल होत असतात. सेवानिवृत्ती स्वीकारलेले ज्येष्ठ पत्रकार अजित भट्टाचार्यजी यांच्या मते मालकांकडून होत असलेल्या या हस्तक्षेपाचे परिणाम आजवर जाणवले नसले तरी संपादकीय विभागामध्ये त्याबाबत नाराजी जरूर आहे. एक्सप्रेस सोडून जात असलेले पत्रकार शेठजी जेवढे भासवतात तेवढ्या सरळपणे गेलेले नाहीत. दोघांच्याही मनात नाराजी आहे. अजित भट्टाचार्यजी यांनी एक्सप्रेससाठी जो अखेरचा म्हणून मजकूर लिहिला तो मुळगावकर यांनी नाकारला, तर कुलदीप नायर यांचे अखेरचे लिखाण स्वतः शेठजींनी संपादित केले. एक्सप्रेससारख्या मोठ्या पत्रामधील हे फेरबदल आणि त्यावर उठत असलेले सादपडसाद वृत्तपत्रसृष्टीत चर्चेचा विषय झाले आहेत.

## □ दिलासा देणारा विजय

इंदिराजींच्या पक्षाचे परिपूर्ण वर्चस्व असलेले राज्य म्हणजे आंध्रप्रदेश. याच आंध्रप्रदेशामधील प्रकाशम जिल्ह्यामधील चिराला मतदारसंघामध्ये जी विधानसभेची पोटनिवडणूक झाली ती जनता पक्षाचे उमेदवार डॉक्टर एस. चंद्रमौळी यांनी वीस हजाराहून जास्त मताधिक्याने जिंकली. या निवडणुकीसाठी प्रचारमोहिमेला प्रारंभ केला त्या वेळी सर्व विरोधी पक्षांतर्फे एकच उमेदवार उभा रहात असल्याने आपण इंदिरा कॉंग्रेसला बऱ्यापैकी टक्कर देऊ शकू अशी विरोधी पक्षांची अपेक्षा होती. तथापि निवडणुकीचे वातावरण जसे तापू लागले तसा विरोधी पक्षाचा आत्मविश्वास वाढू लागला; निवडणुकीला चार-एक दिवस असताना आपण ही निवडणूक पाच-एक हजार मतांनी जिंकू असे जनता पक्षाच्या उमेदवाराने जाहीरपणे सांगितले होते. प्रत्यक्षामध्ये वीस हजाराहून अधिक मताधिक्य

लहान भावंडांसाठी काय न्यावं बरं ?

सुटी झाली की बोर्डिंगमधून कधी घरी जाईन असं होई
मनांत विचार यायचा-लहान भावंडे माझ्या येण्याची वाट पहात
असतील. त्यांच्यासाठी मी काहीतरी आणलं असणार
या कल्पनेनं गेल्या गेल्या माझी बॅग उघडतील
पण मोजक्याच पैशांतून त्यांच्यासाठी काय न्यावं असा प्रश्न पडे
मी मनाशी ठरवलं-
दिवसभर शेतात राबून कष्ट करणारे बाबा न चुकता
मला पैसे पाठवतात. स्वतःवर फारसा पैसा खर्च न करता
मी दरमहा थोडे थोडे पैसे सांगली बँकेत ठेवू लागलो
सुटीवर जाताना मी लहान भावंडांसाठी कधी कपडे
कधी पुस्तके, खेळणी नेऊं लागलो

माझ्या अडचणीचं उत्तर सांगली बँकेतील बचतीत सापडलं

आपल्या उत्कर्षातील साथीदार
दि सांगली बँक लि.
रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली
चेअरमन : एम. आर. रणदिवे



Parkerson 8140 Mar.


मिळाले. प्रत्येक मतदानकेंद्रावरील मतांची स्वतंत्रपणे मोजणी केल्याने मतदान कसे झाले याचा तपशील समजू शकला. दलित आणि अल्पसंख्यांक यांचा अजूनही इंदिरा काँग्रेसला पाठिंबा आहे, असा सर्वसाधारण समज असला तरी या पोटनिवडणुकीमधील मतदान ह्या दावा नाकारणारे आहे. चिराळा गावामधील ख्रिश्चन मतदारांचे आधिक्य असलेल्या मतदानकेंद्रावर जनता पक्षाचे उमेदवारास १,३३३ मते मिळाली तर इंदिरा काँग्रेसच्या उमेदवारास केवळ ७१६ मिळाली. हरिजन आणि मुसलमान यांचे प्राधान्य असलेल्या मतदानकेंद्रावर जनता पक्षाला ७९९ मते मिळाली तर इंदिरा काँग्रेसच्या उमेदवारास केवळ १२८ मते पडली. नाही म्हणायला कोळी समाजाचे वर्चस्व असलेल्या वदराऊ या गावी मात्र इंदिरा काँग्रेसला फार मोठे मतदान झालेले दिसते. तेथे ७१० मतदारांनी इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराची निवड केली तर जनता पक्षाच्या उमेदवारास केवळ १९४ मते पडली.

या निवडणुकीच्या प्रचारकार्यात भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांना असे आढळून आले की, वाढत्या महागाईमुळे गोरगरीब विलक्षण संत्रस्त झाले असून त्यांचा इंदिरा काँग्रेसवर चांगलाच राग आहे. ज्या कारखान्यात काम करणाऱ्या बायका विरोधी पक्षांकडे ढुंकूनही पाहायला तयार नव्हत्या अशा बायकांनी जनता पक्षाच्या उमेदवारासाठी उत्स्फूर्तपणे काम केले. इंदिरा काँग्रेसचे प्रचारक घरोघरी हिंडत असताना वाढत्या महागाईबद्दल महिलांनी तीव्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. 'तेल इतके कडाडले आहे की आम्ही काय पाण्यात भाज्या शिजवायच्या काय ?' यासारखे कडवट प्रश्न इंदिरा काँग्रेसच्या प्रचारकांना विचारण्यात आले !

या निवडणुकीमधील विजयाची मीमांसा करताना एका गोष्टीची नोंद करणे आवश्यक वाटते. सर्व विरोधी पक्षांच्या वतीने एकच उमेदवार उभा करण्यात विरोधी पक्षांना यश आले आणि एकदा जनता पक्षाचे डॉ. चंद्रमौळी यांची निवड निश्चित झाल्यावर डाव्या कम्युनिस्टांपासून ते भाजपपर्यंत सर्व पक्षांनी त्यांच्यासाठी मनःपूर्वक काम केले. याउलट इंदिरा काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली होती. या मतदारसंघात विणकर समाजाचे वर्चस्व आहे. त्यांच्या उमेदवाराला तिकिट देण्यात येईल असे भासवण्यात आले आणि प्रत्यक्षात या समाजासाठी काम करणाऱ्या परंतु समाजाचा वारसा नसलेल्या बी. पी. बापय्या शेट्टी यांची निवड करण्यात आली. पक्षाच्या तिकिटासाठी जे बारा इच्छुक होते त्या सर्वांनी पक्षविरोधी कारवाया केल्या असा इंदिरा काँग्रेसचा दावा असून या पराभवाचे खापर पक्षांतर्गत फाटाफुटीवर फोडण्यात आले आहे. कारणे काहीही असली तरी इंदिरा काँग्रेसचे वादातीत वर्चस्व असलेल्या आंध्रप्रदेश या राज्यामधील ही पोटनिवडणूक जिंकून विरोधी पक्षांनी दिलासा देणारी कामगिरी बजावली आहे.

श्यामचा ससार (कथा दहावी)

फिरोज रानडे

# क्रॅमर vs क्रॅमर व राधा

'आमचा बायकांचा जन्म असाच. आमच्या व्यक्ति-विकासाला काही scope म्हणून नाही आहे बघा!' एका संध्याकाळी स्वतःशीच हळहळत राधा श्यामला चहा देत म्हणाली.

सर्वसाधारण वेळी श्यामने, आता आणखी किती व्यक्ति-विकास व्हावयाचा बाकी आहे. असा राधाच्या गुटगुटीत शरीरप्रकृतीकडे पाहून, मराठी विनोदी लेखकायोग्य विनोद केला असता; पण राधाचा आता चेहरा-मोहरा पाहून ती कोणत्याही तऱ्हेचा विनोद ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नाही हे श्यामने झटकन ओळखले व तो चहाचे घुटके घेऊ लागला.

खरं म्हणजे राधाचा व्यक्ति-विकासाचा स्टोव्ह येत्या काही दिवसात भडकणार असे भाकित श्यामने मनाशी करून ठेवले होते. त्यामुळे भडकण्याला त्याची मानसिक तयारी होती. कारण नुकताच त्यांनी क्रॅमर vs क्रॅमर हा चित्रपट पाहिला होता. सिनेमा इंग्रजी असल्यामुळे सगळा न कळून थोडा लाभ झाला असता तर उरवठघाला-पुरवठा म्हणून 'साध्या' व 'फोडणी'च्या अश्या दोन्ही मासिकांनी सिनेमाचे जे बारकावे दाखवून द्यावयास सुरुवात केली होती व जोडीला कौतुक केले होते त्यामुळे तो लाभही पदरी पडला नाही.

श्यामची 'साध्या' व 'फोडणी'च्या मासिकाबद्दलची व्याख्या अगदी साधी व सरळ होती.

साधी मासिके म्हणजे ज्यात बाया-माणसांची चित्रे नसतात. अगदी मलपृष्ठ १ पासून ४ पर्यंत ज्यात वेगळ्या वेगळ्या डॉक्टरांनी लिहिलेला गंभीर मजकूर असतो ती साधी मासिके. आता क्वचित अफगाणिस्तानच्या 'कडक थंडी'वरच्या लेखामुळे कधी अंग शहारले असेल वा ३०० रुपये दराच्या लढ्याबद्दल वाचून 'उस डोंगा पण साखऱ्या नव्हे डोंगा' अशी तुकारामबुवांची अभंगवाणी आठवण करून देणारी एखादी लेखमाला वाचून अंगावर हलव्यासारखा काटा आला असेल अशी काही सदरे सोडून सामान्यपणे ह्या मासिकातून एखादा विषय घेऊन त्याचे अगदी कांडात काढलेले असते. जाहिरातीसुद्धा अगदी पानात तंबाखू असते तशी बदनामीपुरती!

ज्यात अगदी मुखपृष्ठापासून पाना-पानावर बायांच्या मुखांची व पृष्ठांची रंगी-बेरंगी चित्रे काढलेली असतात व ज्यात चटकदार बायकांनी चटकदार बायकांवर चविष्ट गोष्टी लिहिलेल्या असतात, अशी मासिके म्हणजे 'फोडणी'ची मासिके! त्यातल्या नायिकांची आपल्याला जुन्या मित्रांशी कशी नेहमी लफडी जमतात ह्याचा श्यामला नेहमी अचंबा वाटत असे व नायिकांच्या व लेखिकांच्या धाडसी वृत्तीबद्दल कौतुक वाटत असे. तो म्हणावयाचा, 'काय बहाद्दूर बायका आहेत ह्या!' स्वातंत्र्य नसताना ह्या अश्या गोष्टी लिहितात तर स्वातंत्र्य मिळाल्यावर त्या काय करतील?'

अश्या 'फोडणी'च्या मासिकातून गंभीर मजकूर अगदी पानात तंबाखूसारखा बदनामीपुरता असतो. अशी ही साधी व फोडणीची मासिके सर्व बाबतीत I आणि U असली तरी इंग्रजी सिनेमे-प्रायोगिक सिनेमे व नाटके ह्यांचे कौतुक करण्याबाबत मात्र अगदी भाजप असतात! म्हणजे अगदी भक्ति-भावाने त्यांची भरमसाट स्तुती वगैरे करत असतात.

आता क्रॅमर vs क्रॅमर अतिशय सुंदर सिनेमा असेल म्हणजे आहेच; पण त्याचा हिंदी जीवनाशी संबंध काय? असले सिनेमा किती हिंदी लोक पहातात? बरं जे पहांवात त्यांच्या जीवनात असले प्रश्न निर्माण होतात का? बरे समजा झाले तरी त्यातल्या एका क्रॅमरने जो मार्ग स्वीकारला तो स्वीकारायची ह्यांची तयारी-निदान मानसिक तरी असते का? पण असे प्रश्न करतो कोण?

असो. ही चर्चा साध्या मासिका-योग्य गंभीर झाली; पण अशी साध्या मासिका-योग्य चर्चा करून बायकांचा राग गेला असता तर काय पाहिजे होते? म्हणून श्यामने साध्या मासिका-योग्य चर्चा न करता राधाच्या कलाकलाने घ्यावयाचे ठरवले व म्हणाला, 'खरे आहे तुझे म्हणणे!'

आता श्यामनेच खरे आहे तुझे म्हणणे असे म्हटल्यावर राधाचे पुढले बोलणेच खुंटले. त्यामुळे राधाला पुढे काय बोलावे तेच सुचेना; पण राग आला होता तो तर काढायला पाहिजे ना? म्हणून ती रागारागाने पुढे म्हणाली, 'नुसते खरे आहे म्हणून काय उपयोग? त्यासाठी तुम्ही काही कराल की नाही? स्त्री-मुक्ती चळवळीत पुरुषांनी पण काही करायला पाहिजे!'

'भले!' श्याम नेहमीप्रमाणे मनाशी म्हणाला, 'अग, स्त्री-मुक्ती चळवळ स्त्रियांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या कल्पनेवर तर उभी आहे ना? आता पुरुषांनीच त्याच्याकरता काही करावयाचे म्हणजे चर्चिल वगैरे साहेब लोकांनी गांधींच्या चळवळीकरता काही करावयास पाहिजे होते, असे म्हणण्यासारखेच झाले! पण रागावलेल्या बायकोबरोबर शहाण्या माणसाने वाद घालू नये व श्याम तर नंबर एकचा शहाणा होता!

'खरं आहे तुझे म्हणणे. पुरुषांनी काही करावयास पाहिजे खरे' असे श्याम म्हणाला व राधा जाम भडकली. बायकांना पुरुषांचा खरा राग ते ज्या वेळी बायकांना कोठलाही विरोध करत नाहीत त्या वेळी येतो. 'तुमच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही!' असे म्हणून राधा तरातरा पद्धतीने स्वैपाकघरात निघून गेली.

ही झाली शुक्रवारची गोष्ट. शनिवार तर काय घातवार म्हणून प्रसिद्ध, तोही प्रसिद्धीप्रमाणेच गेला. मग उजाडला रविवार!

रविवारी शांताबाई म्हणजे राधाच्या कामाच्या बाई थोड्या व कधी कधी फार

उशीरा येतात. वेळेवर येणाऱ्या कामाच्या बाई पाहिल्या आहेत कोणी ? राधाला तर प्रतिमा आणि प्रतिमा अगदी आवर्जून पहावयाचे असते. त्यामुळं शांताबाईंना थोडा जास्त उशीर झाला की, T. V. वरचे प्र आणि प्र कार्यक्रम सुरू होण्याआधी राधा व शांताबाईंचा घरगुती प्र आणि प्र हा कार्यक्रम होत असे.

T. V. च्या कार्यक्रमात प्रथम पाहुण्यांची ओळख व मग प्रश्नांची सरबत्ती असा क्रम असतो; पण घरगुती कार्यक्रमात दोन्ही पात्रे एकमेकांना ओळखून असतात. त्यामुळे प्रश्नांची सरबत्ती एकदम सुरू होते. T. V. च्या प्र आणि प्रमध्ये एक जण प्रश्न विचारतो व दुसरा उत्तर देतो. असा प्रकार घरगुती प्र आणि प्र मध्ये नसतो. दोघेही जण प्रश्न विचारून दुसऱ्यास उत्तर शोधावयास लावतात. उदा. 'शांताबाई, आज उशीर का झाला ?' राधा. 'उठायला उशीर झाला, कशी लवकर येणार सांगा !'

पण अशी प्रश्नांची झटापट होत असली तरी ती फक्त पहिली ४–५ मिनिटेच ! नंतर मग राधा व शांताबाईमध्ये घरगुती प्रश्नावर विचार व सल्ला आदान-प्रदानाचा कार्यक्रम सुरू होतो.

'शांताबाई, रविवारचा एक दिवस लवकर या म्हटलं तर तुमच्यानं जमत नाही ना ?' राधा घरगुती प्र आणि प्रचा कार्यक्रम सुरू करत म्हणाली.

'काय सांगू बाई ?' कामाच्या बायका दोन्ही हाताचा टेका देत बसतात तसे बसत शांताबाई म्हणाली. शांताबाईच्या बोलण्यात


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मूल्यांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०


थोडं कौतुक पण होते. 'रविवारचा नवरा काही लवकर उठत नाही व मला पण उठू देत नाही. मग कशी येणार लवकर सांगा !'

क्रॅमर vs क्रॅमर सिनेमा बघण्याआधी राधावर ह्या उत्तराची प्रतिक्रिया काही वेगळी झाली असती. नवरा रविवारी लवकर उठत नाही व उठू देत नाही, हे राधाने स्वतः अनुभवलेलं होतं. त्या उत्तरामागचा भावार्थ तिलाही माहीत होता. त्यामुळे क्रॅमर vs क्रॅमर बघण्यासाठी 'साहजिकच आहे बाई, आठवड्यातून पुरुष-माणसाला एक दिवस सुट्टीचा मिळणार वगैरे वगैरे' असे राधानेच म्हटले असते.

पण व्यक्ति-स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाल्यापासून नवऱ्याचा कोणताही हुकूम, मग अगदी तो जास्त वेळ झोपायबद्दलचा का असेना, तो मोडलाच पाहिजे व क्रॅमर vs क्रॅमर पाहिल्यापासून ह्या सगळ्या प्रश्नांवर तोडगा म्हणजे स्त्रीने घर सोडणे हाच होय, हेही राधाच्या मनाने पक्के केले होते; पण स्वतःला जरी तसे वागणे शक्य नसले तरी आपल्या घरच्या कामाच्या बाईने का वागू नये हा मराठी मध्यमवर्गातल्या बाईला पडणारा प्रश्न राधालाही पडत असे व आताही पडला.

मग राधाने आपल्या परीने क्रॅमर vs क्रॅमरचे मराठी स्वैर रूपांतर करून शांताबाईला सांगितले. शांताबाई काम करता करता 'आता ग बाई ?' 'काय म्हणावं या बाईला' वगैरे वाक्यांनी आपली प्रतिक्रिया दाखवत होती; पण एवढे सगळे होऊनही शांताबाईवर क्रॅमर बाईच्या वागण्याचा व घर सोडण्याचा म्हणावा तसा इष्ट परिणाम झालेला दिसला नाही. कारण सगळे 'क्रॅमरायण' ऐकून झाल्यावर शांताबाई म्हणाली, 'असं कसं म्हणता बाई ? मुला-बाळांचं भरलेलं घर सोडून बाईमाणसाला कसं जाता येईल ?'

शांताबाईचा हा मागासपणा पाहून राधाच्या जिवाचा अगदी तीळ-पापड झाला. ह्या बायका अशाच अडाणी रहाणार. त्या आणि त्यांचं नशीब ! त्यांचीच जर पुरुषांची गुलामगिरी सहन करण्याची तयारी असेल तर आपण तरी कशाला जीव थोडथोडा करा वगैरे म्हणत, T. V. वर कोणा एका शास्त्रीबुवा व त्यांच्या पत्नीवरचा- त्यांचे एकमेकांच्या समजूतदारपणे वागण्याने जीवन यशस्वी कसे झाले– ह्या वरचा प्र आणि प्र. हा कार्यक्रम बघावयास राधा बैठकीच्या खोलीत गेली.

असेच काही दिवस गेले. एका रविवारी शांताबाई खरंच लवकर आल्या. सगळ्यांना आश्चर्याचा धक्काच बसला; पण राधाला तो जास्त जाणवला. कारण शांताबाई वेळेआधी आल्यामुळे घरगुती प्र आणि प्र ला कशी सुरुवात करावी हे त्यांना कळेना. काही बरे-वाईट झाले नसेल ना ह्या कल्पनेने राधाने चाचपडत प्रश्न विचारला, 'काय शांताबाई, ठीक आहे ना ?'

'ठीक नसायला काय झाले ?' शांताबाई उत्तरल्या !

'नाही, रविवार असून वेळेवर आलात म्हणून म्हटले.' राधाही पक्की होती. ती काही शांताबाईला वेळेआधी येण्याचे क्रेडिट द्यायला तयार नव्हती. 'घरी काही विशेष ?' राधाने त्याच सावधगिरीने विचारले. मनात एक भय होते. अन्यायाला शरण न जाता नवऱ्याला सोडून जा म्हणून आपण मारे सगळे समजावून सांगितले, तर आता ही बया आपलेच घर सोडून तर जाणार नाही आहे ना ? हे ते भय ! व म्हणून सावधपणा.

शांताबाई नेहमीच्या स्टाइलने खाली बसत म्हणाली, 'अहो, तो द्वाड नवरा मला फार छळायला लागला. दिला घरातून हाकलून !'

'ऑं !' राधाला आश्चर्य दाखवायला दुसरा योग्य शब्द सापडेना.

'तर काय हो ! परवा तुम्ही त्या सिनेमाची गोष्ट सांगितलीत ना ? त्यात ती बाई आपले घर सोडते; पण सगळं लक्ष आपलं मुलात ! बाई, मी म्हणते की आपण बाया जर घराच्या मालकिणी तर आपणच घर काय म्हणून सोडायचं ? फार पिरपिर करायला लागला, नसती बाळंट घ्यायला लागला. म्हटलं, भडव्या, ऊठ–नीघ घराबाहेर !' शांताबाई एवढं म्हणून उठली व खसाखसा भांडी घासायला लागली.

क्वचितच मनाशी बोलणारी राधा मनाशी म्हणाली, 'घ्या ! आणि मी हिला मागास समजत होते !'

□

पुस्तके

शेतकरीनेते श्री. शरद जोशी यांचेकडे 'माणूस' मधून तेरा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या या अभिप्रायाचे कात्रण कुणी तरी नुकतेच पाठवून दिले. अभिप्राय वाचून शरद जोशी यांचे मूळ पुस्तकाविषयी फार चांगले मत झालें व तसे त्यांनीं मोकळेपणाने, निपाणीला गजाआड बंद होण्यापूर्वी झालेल्या खाजगी गप्पांतून १।२ वेळा सांगितलेंही. सध्याच्या शेतकरी आंदोलनामागील विचार समजण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल म्हणून येथे हा अभिप्राय पुनर्मुद्रित केला आहे. अभिप्राय-लेखक आहेत श्री. दत्तप्रसाद दाभोळकर. 'माणूस' मधून दिल्लीच्या शेतकरी मेळाव्याचा सविस्तर वृत्तान्त वाचकांना त्यांनी अलीकडेच सादर केला होता. (दि. ७ मार्च ८१ अंक)

# दुष्काळ निर्मूलन केव्हा होईल ?

अन्नस्वतंत्रता संचलन सुरू होण्याच्या खूप आधीची घटना. जवळजवळ चौपन्न सालची गोष्ट. महाराष्ट्रातील एका तरुण शेतकी शास्त्रज्ञाने तेव्हा एक प्रबंध लिहिला होता. प्रबंधाचे नाव होते 'महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना.' हा प्रबंध अनेक दृष्टींनी खळबळजनक होता. काही मुलखावेगळे विचार त्यात मांडले होते. स्वतःच्या मतांचे समर्थन करण्यासाठी फार भरभक्कम पुरावा त्यात दिलेला होता. प्रचलित समजुतींना हादरा देणारा हा प्रबंध लिहिणाऱ्या तरुणाचे नाव चारुदत्त दाभोळकर. हा प्रबंध लिहिला तेव्हा हा तरुण ग्लासगो विद्यापीठात शेतीचे उच्च शिक्षण घेत होता. त्या विद्यापीठातील अनेक सुवर्णपदके त्याने संपादन केलेली होती आणि या तरुणाचे ज्ञान केवळ पुस्तकी नव्हते. महाराष्ट्रात, डेन्मार्कमध्ये आणि ब्रिटनमध्ये प्रत्यक्ष शेतावर काम करण्याचा अनुभव पण या तरुणाच्या गाठीशी होता. लोकांच्या समजुतींना हादरा देणारे विचार मांडणेपण या तरुणाला तसे नवे नव्हते. हा तरुण 'किर्लोस्कर'मधून नियमितपणे शेतीविषयावर लेखन करीत होता. या देशात खरेखुरे गोसंवर्धन करावयाचे असेल तर गायी कापणे अगत्याचे आहे या मताच्या लेखाला तर 'किर्लोस्कर' मासिकाने यापूर्वी अमाप प्रसिद्धी दिली होती; पण या नव्या प्रबंधातले विचार इतके प्रक्षोभक होते, की महाराष्ट्रातला एकही प्रकाशक या पुस्तकाला मिळाला नाही ! जवळजवळ सहा वर्षे धूळ खात हा प्रबंध पडला होता !

पुढे एक दिवस अचानक या पुस्तकाचे तकदीर बदलले. 'रविवार सकाळ'ने लावलेल्या पुस्तकांच्या हस्तलिखितांच्या बक्षीस-योजनेत पहिल्याच वर्षी हजार रुपयांचे पहिले बक्षीस या पुस्तकाला मिळाले. प्राज्ञ पाठशाळेने या पुस्तकाच्या प्रकाशनाचे काम अंगावर घेतले. माननीय शेतकीमंत्र्यांनी या पुस्तकाला प्रस्तावना दिली आणि एक दिवस वाजत-गाजत हे पुस्तक प्रसिद्ध झाले; पण हे पुस्तक प्रसिद्ध झाले इतकेच ! महाराष्ट्रातील कोणत्याही वृत्तपत्राने या पुस्तकावर अभिप्राय दिला नाही. कोणाही अर्थशास्त्रज्ञाने यातील मतांचे खंडन वा समर्थन केले नाही. मग सर्वसामान्य वाचकांपर्यंत असले पुस्तक पोचण्याचा प्रश्न नव्हताच. या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या बहुतेक सर्व प्रती प्राज्ञ पाठशाळेत पडून असतील. पुस्तक प्रसिद्ध होऊनही आता आठ वर्षे झाली आहेत, पण तरीही या पुस्तकातील विचार ताजे आणि नवे आहेत. किंबहुना जोपर्यंत महाराष्ट्रातील आणि भारतातील दुष्काळ कायमचा हटत नाही, तोपर्यंत हे विचार विचारात घेणे तरी अगत्याचे आहे. भारतातील शेतीसुधारणेचे सारे प्रयत्न चुकीच्या मार्गाने चाललेले आहेत. खोट्या समजुतींवर आणि खोट्या माहितीवर आधारलेले आहेत, असा दाभोळकरांचा दावा आहे. भारतातील दुष्काळ हा एक आर्थिक आजार आहे, ते एक आर्थिक दुखणे आहे, हे लेखकाच्या विचारांचे सूत्र आहे. दुष्काळ टाळावयाचा असेल तर प्रत्येकाने दोन घास जास्त खाल्ले पाहिजेत हे लेखकाला सांगावयाचे आहे.

### प्रबंधाची मांडणी

आपण केवढे वेगळे आणि प्रक्षोभक विचार मांडतो आहोत याची या लेखकाला कायम जाणीव आहे. पुस्तकाची आणि विचारांची मांडणीच त्याने तशी उलटया प्रकारे केलेली आहे. 'आडमुठा शेतकरी', 'पाणीपुरवठा', 'खते', 'सामुदायिक शेती', 'पाश्चात्य व भारतीय शेती' या प्रत्येक प्रकरणात लेखकाने प्रथम प्रचलित विचार नीटपणे समजावून दिले आहेत आणि नंतर भरभक्कम आकडेवारीने आणि इतर पुराव्याने ते विचार खोडून काढले आहेत. प्रत्येक प्रकरण वाचून झाल्यावर प्रचलित विचार चुकीचे आहेत हे लेखकाने आपणास पटवून दिलेले असते; पण लेखक आपणाला कोणत्या उपाययोजनेकडे नेतो आहे, हे मात्र आपल्या लक्षात येत नाही. प्रबंधाच्या शेवटी आपणाला हा सारा उलगडा होतो. तसे सांगावयाचे तर प्रबंधाची मांडणी रहस्यकथेसारखी आहे. शेवटच्या प्रकरणात आपणाला आपला खरा शत्रू समजतो. आपल्यासमोर दुष्काळ टाळण्याचा तेवढा एकच मार्ग आहे हे आपण मान्य करतो.

प्रबंधाची सुरुवात लेखकाने महाराष्ट्रातल्या इतिहासाच्या व भूगोलाच्या समालोचनाने केलेली आहे. यानंतर हिंदुस्थानच्या इतिहासातील तेराव्या शतकापासूनचे सारे ज्ञानदुष्काळ त्याने नोंदवलेले आहेत. पण ही नुसती जंत्री नाही, तर ते प्रकरण म्हणजे एक ललित लेख आहे; या दुष्काळाच्या जंत्रीवर लेखकाने केलेली ही मल्लीनाथी पहा.

"देवगिरीच्या किल्ल्यातील रामदेवराव यादवांच्या कोठारात धान्याच्या जागी मिठाची पोती निघाल्यापासून महाराष्ट्र जीवनाच्या दुधाची दुष्काळाच्या मिठाने वारंवार नासाडी केलेली आढळते. महाराष्ट्रावरील इस्लामी सत्तेच्या काळातील दुर्गादेवीचा १२ वर्षांचा दुष्काळ प्रसिद्धच आहे. पुण्यप्रतापी शिवरायाने महाराष्ट्राचे आनंदवनभुवन करण्याच्या वेळेपर्यंत महाराष्ट्रात दुष्काळाची गस्त फिरल्याच्या खाणाखुणा तत्कालीन वाङ्मयात सापडतात. स्वराज्यस्थाप-

नेच्या सुमारास पडलेल्या दुष्काळाची नोंद तुकाराममहाराजानी केलेली आहे, पण त्यानंतर दुष्काळाने महाराष्ट्रातून जं काळे केले ते तत्कालीन जगातील सर्वांत श्रेष्ठ असा सम्राट आपल्या सर्व शक्ती एकवटून महाराष्ट्रात धुडगूस घालत असतानाही महाराष्ट्रात पाऊल टाकण्याची दुष्काळाची छाती झाली नाही. पुढे इंग्रज–मराठयांच्या युद्धात दारूगोळयाच्या पोत्यांच्या जागी धान्याची पोती निघून मराठयाचे स्वराज्य लयाला जाताच त्या स्वराज्याबरोबरच धान्याने पण देशातून काळे करण्यास सुरुवात केली व इंग्रजी राज्याबरोबर दुष्काळाने पण महाराष्ट्रात पाऊल टाकले "...... Geography of Starvation या पुस्तकात Jone De Casiro यासारख्या जागतिक तज्ज्ञाने म्हटल्याप्रमाणे 'बुभुक्षित इंग्रज बनियांच्या हस्तक्षेपामुळे हिंदुस्थानातील औद्योगिक क्रांती मुळातच उखडली गेली व व हिंदुस्थानात मध्ययुगीन अर्थव्यवस्था व कायमची उपासमार लादली गेली–'.....अतिवृष्टी व अनावृष्टी हे दोन्ही पावसाच्या लहरीपणाचे नमुने आहेत. पण वरुणाला प्रसन्न करण्यासाठी यज्ञात Carbohydrates जाळून हवेतील कार्बनकणाचे व $Co_2$ चे प्रमाण वाढविण्याच्या प्राचीन आर्यांच्या उपायापासून तो $Co_2$ गोठवून त्या गोठवलेल्या ड्रायआइसच्या कणांचा मारा ढगांवर करण्याच्या अद्ययावत् उपायापर्यंत कोणत्याही उपायाने पावसावर हुकमी नियंत्रण ठेवणे अजून माणसाला शक्य झालेले नाही. अर्थात 'जे टाळता येत नाही त्याला तोड दिलेच पाहिजे,' या नियमाने पावसाचा लहरीपणा अपरिहार्य समजूनच आपल्या दुष्काळ नियंत्रणाच्या योजना आखल्या पाहिजेत ....... आणि निसर्गक्रमाने दर पाच वर्षांनी एक वर्ष अवर्षण पडणारच. त्या अवर्षणाचे जर दुष्काळात रूपांतर व्हावयाचे नसेल तर त्या सालची बेगमी बिगर दुष्काळी हंगामातच करून ठेवणे आवश्यक आहे. सुदैवाने पाच वर्षांत अवर्षणाचे जसे एक वर्ष आहे तसेच उत्कृष्ट पावसाचे पण एक वर्ष निसर्गाने महाराष्ट्राला दिले आहे. या वर्षी दुष्काळाला पुरून उरेल इतके भरघोस पीक महाराष्ट्रातील सुपीक जमिनीतून निघू शकते. दुष्काळी विजापूर जिल्ह्यातील 'पिकवील डोण तर खाईल कोण' ही म्हण या संदर्भात लक्षात येते. अशा प्रकारे जादा पिकणारे धान्य दुष्काळासाठी पेवात ठेवण्याचे शास्त्र महाराष्ट्रीय किसानाला फार चागले माहीत आहे. पूर्वजांनी बाधलेली ही भुयारी पेवे महाराष्ट्रात अजूनही सुस्थितीत आहेत... आणि म्हणूनच ज्ञात इतिहासातील सर्वांत मोठा म्हणून ज्याचा उल्लेख होतो, त्या दोजीबारा दुष्काळाच्या वेळी स्वराज्याच्या सुबत्तेत लावण्या-तमाशात मश्गुल होणारा महाराष्ट्र इंग्रजी अंमलात दुष्काळाचे कायमचे हेडक्वॉर्टर का बनला ? आणि आज ५२–५३ साली पडलेला दुष्काळ इग्रजी अंमलाचाच वारसा सागतो काय, याचा शोध आपण घेणार आहोत.'

## आडमुठा शेतकरी आणि मागासलेल्या पद्धती

या अशा प्रस्तावनेनंतर लेखक एकेका गोष्टीकडे वळतो. यातील प्रत्येक प्रकरणाचा उल्लेख करणे अर्थातच गैरसोयीचे आहे. त्यासाठी प्रत्येक जिज्ञासूने हे पुस्तक मुळातूनच नजरेखालून घातले पाहिजे; पण लेखकाच्या विचाराचे नवेपण समजण्यासाठी काही गोष्टींचा उल्लेख करणे जरूर आहे. भारतीय शेतकरी अज्ञानी आहे, आडमुठा आहे. तो काही नवे शिकावयास तयार नाही. आपली भारतीय शेतीची पद्धत कुचकामी आहे, असे मतप्रवाह आपण नेहमीच ऐकतो; पण हे सारे म्हणणे वेडगळपणाचे वाटते. लेखकाने प्रथम याबाबत जागतिक निःपक्षपाती तज्ज्ञाचे अहवाल दिलेले आहेत व त्यानंतर स्वतःची मते दिलेली आहेत.

.. Famive Commission ला केलेल्या रिपोर्टमध्ये दुष्काळी रत्नागिरी जिल्ह्याबद्दल एका साहेबाने केलेला रिपोर्ट असा की ... 'Southern Konkan has nothing to learn from us or American in rice cultivation." तर शेतीशास्त्रज्ञ सर जॉन रसेल म्हणतो, "जगातील कोणत्याही किसानाच्या तुलनेने भारतीय किसान बरोबरीचा ठरेल." एका प्रख्यात कमिशनसमोर साक्ष देताना सर एडवर्डने नमूद केले आहे की, "हिंदी शेतकऱ्यापेक्षा जर आपण एका बाबतीत वरचढ असलो तर तो आपल्यापेक्षा शंभर बाबतीत वरचढ असतो.' डॉ. व्होलकर्ट म्हणतात, "शेती करण्याच्या सर्वसामान्य पद्धतीचा विचार केला तर भारतीय शेतीमध्ये तणाचा नायनाट करून जमीन साफ ठेवणे, स्वत.च्या जमिनीची व तिच्या घटकांची पुरेपूर माहिती असणे, पेरणी व कापणीच्या वेळांबाबत अचूक अंदाज असणे वगैरे बाबतीत भारतीय शेतीपेक्षा पुढारलेली शेती कुठेही आढळू शकणार नाही आणि तेसुद्धा उत्कृष्ट शेतकऱ्यांबाबत नव्हे तर अगदी सर्वसामान्य शेतकऱ्याच्या बाबतीत !... आणि 'India need not starve' या पुस्तकात मिचेल ब्राउननी म्हटलंय "Could the Indian farmers have been given as fair a deal as, say, *his brothers and cousins working* in the cotton mills of Bombay and Ahmedabad there would have been little need to launch a grow more food campaign' [ भारतीय शेतकऱ्याला जरी फक्त गिरणीमजुराइतके पैसे मिळाले तरी भारतात कधीच दुष्काळ पडणार नाही ! ]

पण अर्थातच फक्त साहेब काय म्हणतो हे सांगून लेखक थांबलेला नाही. भारतीय शेतकरी अज्ञानी व आडमुठा नाही या विधानाचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्यानी महाराष्ट्राच्या इतिहासाचापण मागोवा घेतलेला आहे. याबाबत लेखकाने केलेले विवेचन मुळातच पाहण्यासारखे आहे. लेखक म्हणतो, 'रानटी शकांच्या हल्ल्याला पायबंद घालणारा शालिवाहन महाराष्ट्रातील कुंभाराच्या पोटी जन्माला आला आणि इस्लामी सत्तेच्या पायगुणाने महाराष्ट्रात दुष्काळाने ठाण माडताच तिचे उच्चाटन करणारा शककर्ता शिवाजी एका किसानाचा पणतू होता, त्याचे सैनिक आणि सरदार तर महाराष्ट्रीयन किसानच होते. फार काय सर्व सनातनीपणाचे आगर असलेल्या धर्मसत्तेला मोडीत घालून तिच्या जागी नवयुगाच्या धर्माची स्थापना करण्याची जरुरी पडताच भागवतपंथीय संतांनी अगर अर्वाचीन सुधारकानीही केलेले कार्य अजून शिळे झालेले नाही.....शेती सुधारणेबाबतच बोलायचे तर आर्थिकदृष्टया किफायतशीर असलेल्या सर्व सुधारणा महाराष्ट्रीय किसान तत्परतेने उचलीत असल्याचे आढळून येईल. भुईमूग, तंबाखू वगैरेंसारखी व्यापारी पिके किफायतशीर ठरत असल्यानेच परंपरागत धान्यपिकाच्याऐवजी या परकीय पिकांची लागवड अत्यंत तत्परतेने महाराष्ट्रीय किसानाने केली ही गोष्ट त्याच्या सनातनी आणि अडाणी-

पणाचीच द्योतक समजायची काय ?......अडाणी समजला जाणारा असा हा भारतीय किसान एकरी सरासरी किमान उत्पन्न असणाऱ्या भारतीय शेतीतून दुष्काळी मद्रासमधील शेतकऱ्याप्रमाणे स्वतःच्या अक्कलहुशारीने एकरी बारा हजार पौंड भात पिकवून भाताच्या जास्तीत जास्त उत्पादनाचे साडेपाच हजार पौंडाचे रेकॉर्ड मोडू शकतो, अगर कोल्हापूरच्या पाटलाप्रमाणे महाराष्ट्रातील जिराईत जमिनीत एकरी ६५०० पौंड ज्वारीचा जागतिक उच्चांक आपल्या अक्कलहुशारीने निर्माण करून 'कृषिपंडित' ही पदवी मिळवू शकतो. ही उदाहरणे'—आमच्या शेतकऱ्याचे शेती करण्याचे हजारो वर्षांचे जुनेपुराणे ज्ञान आज टाकाऊ झाले आहे' या विधानाला खोडून काढीत नाहीत काय ?

## 'आणखी काही प्रकरणे

अशा या वेगळ्या उफराट्या विचारांनंतर लेखक अधिक खोलात शिरतो. 'सुधारलेली बियाणे', 'खते', 'पाणीपुरवठा', 'दलाली खंड व कर्ज', 'सामुदायिक शेती' ही यातील महत्त्वाची प्रकरणे. यातील प्रत्येक प्रकरणातही लेखकाने असेच जगावेगळे विचार मांडले आहेत. पुन्हा आपल्या मुद्द्याच्या स्पष्टीकरणासाठी भरपूर पुरावा आणि विवरण आहेच. आपल्या सध्याच्या शेतीपद्धतीत, समाजरचनेत तसे काही चूक नाही हे लेखक आपणाला यात पटवून देत आहे.

भारतात लहान लहान तुकड्यांवर शेती करावी लागते. सलग अशी सामुदायिक शेती नसते. त्यामुळे उत्पन्न कमी येते, या विधानाचा लेखकाने समूळ पायाच उखडून काढला आहे. जवळजवळ पंधरा पाने या विवेचनावर त्याने खर्च केलेली आहेत. हे प्रकरण वाचताना तर एखादी बौद्धिक कुस्ती पाहिल्याचे वाचकाला समाधान मिळते. एखादे प्रचलित मत, त्यावर उत्तर, पुन्हा प्रतिप्रश्न असे या प्रकरणाचे स्वरूप आहे या प्रकरणात शेवटी लेखक म्हणतो : १. एकरी सरासरीने भारताच्या तिपटीने भात पिकविणाऱ्या जपानमधील भातखाचराचा आकार पाच चौरस रॉड एवढाच आहे. २. एकरी जास्तीत जास्त उत्पन्न काढण्यासाठी कमीत कमी क्षेत्रावर जास्तीत जास्त श्रम व शक्ती एकवटणे आवश्यक असते. ३. व्यापारी पद्धतीने तुम्ही शेतीवर ट्रॅक्टर वापरणार असाल तर तीन एकरांपेक्षा जास्त शेती एका तळी असणे किफायतशीर नाही. ४. विखुरलेल्या तुकड्यांमुळे शेतकऱ्याला मिळणारा सर्वांत मोठा फायदा म्हणजे बऱ्याच वेळा पावसाच्या अनियमितपणावर त्याचा विम्यासारखा उपयोग होतो.

## पाश्चात्य शेती व भारतीय शेती

लेखकाचे हे सारे विचार ऐकल्यावर वाचकाला साहजिकच प्रश्न पडतो की, हे सारे जर खरे तर मग भारतात दुष्काळ का ? भारतीय शेतकरी जर पुढारलेला आहे तर पाश्चात्य शेतकरी आमच्याहून अनेक पट अधिक असे सरासरी उत्पन्न का घेतो ? पण पाश्चात्य शेती व भारतीय शेती यावरचे लेखकाचे विवेचन अक्षरशः हादरा देणारे आहे. पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञांनी लिहिलेली पुस्तके आपण वाचतो. त्यात आपणास आकडेवारी पाहावयास मिळते. आकडेवारीत नमूद केलेले असते, भारतीय किसान एकरी ८५ पौंड कपाशीचा धागा पिकवितो तर अमेरिकन किसान एकरी १६९ पौंड कपाशीचा धागा पिकवितो. भारतीय किसान सरासरीने एकरी ६३६ पौंड गहू पिकवत असून युरोपियन किसान एकरी सरासरीने ११४६ पौंड गहू पिकवतो; पण ही आकडेवारी बरोबर घेऊन आपण जर प्रत्यक्ष शेतावर जाऊन पोचलो तर ही आकडेवारी बरोबर उलटी ठरते. ही सरासरी आकडेवारीची तुलना, चुकीच्या पायावर झालेली आपणास आढळून येते. शेतीत एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. एखादी जमीन तुम्ही एक दोन वर्षे कुरणाखाली टाकलीत तर नंतर ती जमीन नांगरल्यावर पहिल्या वर्षी भरपूर पिकते. अमेरिकन किसान नेमके हे करतो. समजा, जर एक अमेरिकन शेतकरी या 'नॉर्थफोक फॉर कोर्स रोटेशन' या पद्धतीने चार एकर जमिनीत शेती करत आहे. त्या वेळी तो फक्त एक एकर जमिनीत गहू पिकवील व १/४ जमिनीत वैरणीसाठी टर्निप, १/४ क्षेत्रात वैरणीसाठी ओट व १/४ क्षेत्रात वैरणीसाठी गवत वाढवील. अशा प्रकारे त्याच्या जमिनीपैकी ३/४ भाग कुरणाखाली असेल. पुढील वर्षी या ३/४ जमिनीपैकी एका भागात तो गहू पिकवील आणि गेल्या वर्षी ज्या भागात गहू पिकला तो भाग आता कुरणाखाली जाईल. म्हणजे आता चार वर्षांनी तो भाग पुन्हा गहू पिकविण्यासाठी वापरला जाईल व हे चक्र असे सारखे सुरू असेल. याउलट या वेळी महाराष्ट्रीयन किसान जर त्याची शेती चार एकर असेल तर काय करील ? तो १/ जमिनीत गहू व १/२ जमिनीत ज्वारी घेईल. ही जमीन पण तो फेरपालटाने वापरील. म्हणजे तुम्ही जर आता शेतकी पद्धतीने सरासरी मांडलीत तर ती अशी असेल :

**एकूण शेती चार एकरांतील**

| | शेती भारतीय आकडे पौंडात | शेती पाश्चात्य आकडे पौंडात |
|---|---|---|
| गहू | ११७२ | ११४६ |
| ओट | — | १६०० |
| ज्वारी | १२०० | — |
| ज्वारी (कडबा) | ३००० | — |
| गवत (हे) | — | ३००० |
| टर्निप | — | ३५००० |
| ज्वारी (हिरवी वैरण) | ३५००० | — |

म्हणजे मागासलेला (!) भारतीय शेतकरी सरासरीने कमी उत्पन्न घेत नाही. अमेरिकेतील 'नॉर्थफोक फॉर कोर्स रोटेशन' ही पद्धत आपण वापरली तर प्रत्यक्ष शेतीखालील जमीन बरीच कमी होणार असल्याने आपले सरासरी उत्पन्न वाढल्याचा वरवर भास झाला तरी एकूण उत्पादन मात्र कमी होईल.

## कारणमीमांसा आणि उपाययोजना

प्रबंधाचा यानंतरचा भाग, भारतीय दुष्काळाचे खरे कारण देण्यात आणि त्यावर उपाययोजना सुचविण्यात खर्च केलेला आहे. भारतीय शेती व्यवसायात 'किमान उत्पादनाचे अर्थशास्त्र' (Law of diminishing returns) आज पैमान घातीत आहे असा

लेखकाचा दावा आहे. 'किमान उत्पादनाचे अर्थशास्त्र' या प्रकरणाची सुरुवातच मुळी एका मुलाखतीपासून होते. ती मुलाखत आहे ज्वारीच्या उत्पादनाबाबतचा जागतिक उच्चांक निर्माण करणाऱ्या कृषिपंडित पाटील यांची. या मुलाखतीत श्री. पाटलांनी आपल्या विक्रमाची किमया कोणताही आडपडदा न ठेवता मोकळेपणाने सांगितली आहे. दाभोळकरांनी ही मुलाखत व्यापारी दृष्टीने टिपलेली आहे. पाटलांनी न सांगितलेल्या पण सांगावयास हव्या होत्या अशाही काही गोष्टींची त्यांनी नोंद घेतलेली आहे. पाटलांच्या या शेतीचा एखाद्या व्यापाऱ्याच्या जमाखर्चाच्या वहीप्रमाणे त्यांनी हिशेब दिलेला आहे. शेती हा जर धंदा असेल तर या साऱ्या गोष्टींची नोंद घेणे अगत्याचे आहे. घरच्या माणसाची व बैलाची मजुरी, खर्चावरील व्याज, दुष्काळाच्या वर्षासाठी तरतूद, देखरेख करणाऱ्या घरच्या माणसाची मजुरी सारे यात नोंदवलेले आहे. शेतीचा हिशेब कशा प्रकारे ठेवावयास हवा हे समजण्यासाठी तरी प्रत्येकाने हे प्रकरण एकदा जरूर अभ्यासले पाहिजे. यानंतर लेखकाने आणखी एक मुलाखत नोंदवलेली आहे. आपल्या शेतीवर किमान उत्पन्न घेणाऱ्या सर्वसामान्य भारतीय शेतकऱ्याच्या जमाखर्चाची नोंद त्यांनी केलेली आहे. या दोन मुलाखती वाचल्यावर, हे दोन हिशेब बारकाईने नजरेखाली घातल्यावर एक गोष्ट लक्षात येते. कृषिपंडित पाटलांच्या पद्धतीने शेती करणे आतबट्ट्याचे आहे. एकरी जितके कमी उत्पादन घ्याल तेवढा आज शेतकऱ्याला अधिक नफा सुटतो आहे; किंबहुना अधिक नफा मिळविण्यासाठी जेवढे कमी उत्पादन घ्यावयास हवे तेवढे कमी उत्पादन घेऊन भारतीय शेतकरी आज अगतिकपणे उभा आहे. थोडया वेगळया शब्दात मिचेल ब्राउननी म्हटलेले, 'Could the Indian farmers have been given as fair a deal as, say, his brothers and cousins working in the cotton mills of Bombay and Ahmedabad there would be little need to launch a grow more food campaign' हे शब्द अक्षरशः खरे आहेत.

—खरोखरच परिस्थिती फार केविलवाणी आहे. शतकाशतकांचे व्यवहारज्ञान बरोबर घेऊन चालू जगात उभा असलेला भारतीय शेतकरी आज अगतिक बनला आहे. त्याची साऱ्या बाजूनी कोंडी झालेली आहे. देशात एखादा नवा कारखाना सुरू केला तर परदेशांतून येणाऱ्या मालावर आपण बंदी घालतो. किमानपक्षी त्याच्यावर भारी कर बसवून नव्या भारतीय कारखान्याला आपण संरक्षण देतो आणि शेतीच्याबाबतीत काय घडते? परदेशातून आणलेले धान्य शेतकऱ्यासमोर स्पर्धेसाठी बाजारात असते. हे धान्य पदरचे पैसे घालून स्वस्त विकण्याचा हट्ट असतो. या परिस्थितीत जगातला कोणताही धंदा कधी वाढू शकणार नाही.

भारतीय शतकऱ्यासमोरची कोंडी फुटू शकेल काय?—भारतीय शेती या चक्रव्यूहातून बाहेर येऊन स्वत:च्या पायावर उभी राहील का?—या साऱ्या प्रश्नाचा उत्तर आपणास कदाचित फार सुलभपणे मिळू शकतील; पण मग एका नव्या मार्गाने आपणास विचार करावा लागल. शती हा एक धंदा आहे हे तर कधीच नजरेआड करता येणार नाही. तुम्हा-आम्हाला त्यावर एक मार्ग सुचतो. शेती-उत्पादनाला भरमसाठ किंमत द्या, हा आपणाला वरवर सुचणारा माग आहे; पण हा उपाय आपण अमलात आणू शकत नाही. कारण भारतासारख्या शेतीप्रधान देशात लोकांच्या खिशात पैसे जातात ते अखेर शेतीच्या उत्पादनातूनच. हे एक दुष्टचक्र आहे. लेखक म्हणतो, भोवऱ्यात सापडल्यावर त्याच्या एकाच कडेवर कितीही नेटाने प्रयत्न केला तर त्यातून सुटका न होता पोहणाऱ्याची शक्ती मात्र क्षीण होते; परंतु भोवऱ्याच्या तळाला जाऊन खालून पोहत गेल्यास अल्प श्रमात त्यातून सुटका होऊ शकते.

लेखकाच्या मते दारिद्र्याच्या भोवऱ्यातून देशाची सुटका करण्यासाठी आपणास असाच काही मार्ग आखावयाचा आहे. अर्थात त्यासाठी लेखकाने सुचविलेला उपाय मी मुद्दामच येथे देत नाही. कारण मग त्यामुळे या विषयाची आस्था असलेले वाचक मूळ पुस्तकास हात न लावण्याची शक्यता आहे. लेखकाचे विचार समजावून सांगताना त्यात काही गफलत होऊन मी काही चुकीचा विचार सांगण्याचाही धोका आहे. एखादा संपूर्ण नवा विचार समजावून घेताना वा देताना अशी गफलत अनेकदा नकळत होऊ शकते. त्यासाठी या ज्वलंत प्रश्नाची आस्था असलेल्यांनी हे पुस्तक मुळातच वाचावे.

चारुदत्त दाभोळकरांचे विचार बरोबर आहेत, असे मला अर्थातच म्हणावयाचे नाही. त्या विषयात माझा तसा काही अधिकारही नाही; पण हे विचार ज्यांना पटत नाहीत अशा कोणा अधिकारी तज्ज्ञांनी पुराव्याने दाभोळकरांच्या विचारांतील कमकुवतपणा दाखवला नाही तर ते विचार असेच राहणार आहेत. माझी या पुस्तकाच्या अनुषंगाने फक्त एकच तक्रार आहे ती ही की, असे विचार सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचवले जात नाहीत. अधिकारी तज्ज्ञ लोक तर अशा विषयाकडे दुर्लक्ष करतात. महाराष्ट्रातील साऱ्या वृत्तपत्राकडे हे पुस्तक अभिप्रायार्थ गेल्यावर त्यावर अभिप्रायही येऊ नये हे कशाचे द्योतक आहे?— महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनात आज एक विलक्षण मरगळ पसरलेली आहे. कोणताही नवा विचार समजावून घेण्याची कोणाला काही जरुरीच वाटत नाही. हे पुस्तक काही एकमेव उदाहरण नाही.* अन्नस्वतंत्रता संचलनाचे खंडन वा समर्थन करून काही विचारमंथन करण्याची कोणाला फारशी आवश्यकता वाटली नाही. गारगोटीच्या 'स्वाश्रय' सारखी एक सर्वस्वी वेगळी योजना शास्त्रीय नियमावर आणि निकषावर कोणी घासून-पुसून घेतली नाही. इतकेच कशाला, गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेला राममूर्तींचा अहवाल घ्या. बंगाल आणि महाराष्ट्र यांना नोकऱ्यात फार मोठा वाटा मिळतो असा त्यात साधार पुरावा आहे. केरळ-आसाम यांच्यावर अन्याय होतो असा त्यात दावा आहे. प्रांतीय चळवळी या प्रांतात उभ्या रहातील आणि अखेर देशाचे तुकडे पडतील असे त्यात भाकीत आहे. नोकरीत महाराष्ट्रावर अन्याय होतो म्हणून संतापून ओरडणाऱ्या एकाही मराठी वृत्तपत्राने अजून या अहवालाचे खंडन केलेले नाही. एखादा नवा विचार साधार टीकेने हतप्रभ करण्याऐवजी तो उपेक्षेने मारण्याची महाराष्ट्रातील ही नवी प्रथा अखेर भयावह ठरेल, इतकेच मला नम्रपणे सुचवावयाचे आहे. □

प्रथम प्रसिद्धी: माणूस १६ नोव्हेंबर १९६८ अंक.

*अन्नस्वतंत्रता संचलन : अमेरिकेकडून येणाऱ्या पी.एल. ४८० या धान्यमदतीचा धिक्कार करण्यासाठी वेरूळ ते मुंबई (श्रीकैलास ते सिंधुसागर) निघालेली पदयात्रा.

[ महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना : लेखक : चा. भ. दाभोळकर : प्रकाशक : प्राज्ञ पाठशाळा, वाई : पृष्ठे १३८ : किंमत २ रु. ]

## राखीव जागा पुस्तिका

# राजकारण नको लोकशिक्षण हवे !

गुजराथमध्ये वैद्यकीय विद्यार्थ्यांनी राखीव जागाविरुद्ध केलेलं आंदोलन जवळजवळ साडेतीन महिन्यांनंतर आता थांबलं आहे, म्हणजे त्यानं एक विराम घेतला आहे; ते संपलं आहे असं म्हणता येणार नाही. त्यातही वैद्यकीय विद्यार्थी आणि ज्युनिअर डॉक्टर्स यांनी हे आंदोलन थांबवलं असलं तरी 'अनामत बैठक विरोधी समिती' या वैद्यकीयेतर विद्यार्थ्यांच्या प्रमुख संघटनेनं मात्र ते मान्य केलेलं नाही. शिवाय बडोद्याच्या वैद्यकीय विद्यार्थ्यांनी आणि ज्युनिअर डॉक्टर्सनीही बहिष्कार चालूच ठेवला आहे. (मात्र तो राखीव जागांच्या विरोधात नाही, तर राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली गुजराथमध्ये स्थानबद्ध केलेल्या सर्वांच्या मुक्ततेच्या मागणीसाठी आहे.) म्हणजेच 'गुजराथ आंदोलन संपलं आहे' हे म्हणणं पूर्णपणानं खरं नाही. काही प्रमाणात का असेना, ते चालूच आहे, ही वस्तुस्थिती आहे.

त्याबरोबरच आणखी एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे, आंदोलन मागे घेणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांची भूमिका. आंदोलन मागे घेतल्याची घोषणा करत असतानाच हे विद्यार्थी मात्र राखीव जागा रद्द करण्याची आमची मूळ मागणी आम्ही सोडलेली नाही,' असं स्पष्टपणे सांगत होते. हीच भूमिका त्यांनी अद्याप कायम ठेवली आहे. 'जातीय तत्त्वावर आधारित असलेल्या राखीव जागाना आमचा पूर्ण विरोध आहे आणि त्या रद्द होण्यासाठी आमचा लढा आम्ही शेवटपर्यंत चालूच ठेवू!' असं वैद्यकीय विद्यार्थी-ज्युनिअर डॉक्टर्स संघटनेच्या नेत्यांनी अनेकदा स्पष्ट केलं आहे. एवढंच नव्हे, तर 'राज्य सरकारशी आमचा समझोता झाला असला तरी राखीव जागाविरुद्ध अन्य एखाद्या संघटनेनं आंदोलन सुरू केलं तर आम्ही त्याला पाठिंबा देऊ. तूर्त काही काळ प्रत्यक्ष भाग मात्र घेणार नाही,' असं आंदोलकांचे एक नेते डॉ. मृगेश वैष्णव यांनी त्याच दिवशी जाहीर केलं होतं. राखीव जागाविरोधी संघटनांचं एक महामंडळ स्थापन करण्याच्या हालचाली तेव्हा सुरू होत्या आणि त्यांची संघटना त्यात सहभागी होणार होती. आता तेही झालं आहे. 'राखीव जागा बरखास्ती महामंडळ' ही संघटना स्थापन झाली आहे. 'राखीव जागाविरोधी चळवळ देशव्यापी करण्याचा' आणि 'राखीव जागा रद्द होण्यासाठी मरेपर्यंत लढा देण्याचा' निर्धार या महामंडळानं व्यक्त केला आहे. केंद्र-राज्य सरकारी कर्मचाऱ्यांपासून बँका-वकिली-विद्यापीठ अशा विविध क्षेत्रांतले कर्मचारी या महामंडळात सहभागी झाले आहेत आणि २८ एप्रिलला त्यानी नवी दिल्लीमध्ये 'अखिल भारतीय राखीव जागांविरोधी मेळावा' आयोजित केला आहे.

हे सारं पाहिलं की, प्रश्न पडतो–गुजराथ आंदोलन थांबलं म्हणजे नेमकं काय झालं? सरकार काय आणि आंदोलक काय, दोघंही मूळ प्रश्नाकडे वळलेच नाहीत. 'तडजोड' 'समझोता' असल्या फसव्या शब्दांनी आंदोलनाचा जोर ओसरवला, हिंसाचार बराच थांबवला, हे खरं आहे. तेही उपकारक आहे, पण मूळ हेतू एवढाच मर्यादित नसल्यामुळं या तडजोडीनं फार मर्यादित उद्दिष्ट साधलं आहे, असंच म्हणावं लागतं. अर्थात सरकारपासून समाजसेवी संघटनांपर्यंत बहुतेक सर्वांनी हा प्रश्न ज्या रीतीनं हाताळला ती पाहता या बाबतीत याहून अधिक काही साध्य होण्याचा संभवही नव्हता आणि नाहीही. कारण भडकलेलं आंदोलन शमवणं, हा पहिला उद्देश होता आणि तो महत्त्वाचा होता. हे खरं असलं तरी या प्रश्नावर मूलभूत उपाययोजना करण्याचा प्रयत्न यात झाला नाही. 'तात्पुरता उद्रेक, 'तात्पुरता उपाय' असंच एकूण हाताळणीचं स्वरूप राहिलं. मूलतः सामाजिक अशा राखीव जागाच्या प्रश्नावर प्रामुख्यानं राजकीय अंगानंच जास्त विचार झाला. त्यामुळं 'तडजोड' 'समझोता' असे प्रकार आले; पण 'सामंजस्य' साधलं गेलं नाही. लोकशिक्षणातून मानसिक परिवर्तनाची प्रक्रिया आठ-पंधरा दिवसांत होणार नाही, हे खरं असलं तरी तिचा चांगला प्रारंभ तरी या आंदोलनाच्या निमित्तानं व्हायला हवा होता, तो कुणीच करताना दिसलं नाही, हा यातला खरा खेदाचा आणि धोकादायक अनुभव आहे.

आणि हे काही आजच घडलेलं नाही. स्वातंत्र्योत्तर काळातल्या सत्तागामी राजकारणाच्या प्रभावाचा हा परिणाम आहे. शिक्षणापासून समाजकारणापर्यंत, साहित्य–कलापासून मूलभूत सोयी–सुविधापर्यंत सर्वच जीवन या राजकारणानं व्यापलं आहे. सर्व बाबींचं राजकीयीकरण करण्याच्या घातक प्रवृत्तीमुळं आज कुठलाही प्रश्न राजकीय नफ्या–तोटयाच्या तराजूत तोलला जाऊ लागला आहे. राखीव जागाचा प्रश्नही त्यातून सुटलेला नाही. 'दलितोद्धार' 'मागासवर्गीयांची उन्नती' 'सामाजिक न्याय' 'समता' ही मुळात अत्यावश्यक आणि सद्भावाची तत्त्वं राजकारणातील चलनी नाणी झाली आहेत. शाब्दिक बुडबुड्यांतून ती उधळली जातात. राजकारण्याच्या या खेळाला लगाम घालण्याइतकी ताकद समाजकारणी मंडळी आजतागायत उभारू शकलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळंच सामाजिक प्रश्न निखळ सामाजिक भूमिकेतून हाताळण्याचा प्रयत्न इथं होताना दिसत नाही.

गुजरातच्या बाबतीत हेच घडलं आहे. विद्यार्थ्यांनी आंदोलन उभारल्यानंतर त्याचे प्रामुख्यान राजकीय पडसादच जास्त उमटत गेले. सर्व राजकीय पक्षांनी आंदोलनाला विरोध केला, राखीव जागा असल्याच पाहिजेत, अशी भूमिका घेतली. संसदेनंही तसा ठराव केला; पण प्रत्येक पक्षाच्या भूमिकेतून 'राखीव जागा आणखी किती काळ चालू ठेवणार?' या प्रश्नाचा सूर जाणवत राहिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ–भारतीय जनता पक्ष यांच्यापासून ते पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीपर्यंत सर्वचजण राजकीय हिशेब मांडून सावधगिरीनं बोलत राहिले. 'राखीय जागा कायम ठेवणं योग्य नाही' असं ध्वनित करता करताच परस्परावर आरोप–प्रत्यारोप करत राहिले. सामाजिक बाजूपेक्षा मतांच्या गणिताला त्याच्या दृष्टीनं जास्त महत्त्व आहे. त्यात सारं तत्त्वशून्य होऊन समाविष्ट केलं जाऊ शकतं. पक्षांतर्गत गटबाजीपासून सगळी गणितं त्यात केली गेली. दलित

नेतृत्वही याला अपवाद नाही, हे नाकारता येणार नाही. कारण शेवटी तेही समाजकारणापेक्षा सत्ताकारणाला जास्त बिलगलेले आहेत. 'राखीव जागा हव्यात की नकोत ?' या गुजराथ–आंदोलनानं उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या मुळाला भिडणं कुणाही राजकीय पक्षाला महत्त्वाचं वाटलं नाही. लाटेवरच्या स्वार्थाचे त्यांचे आडाखे जास्त महत्त्वाचे ठरले. गुजराथ आंदोलनानं निर्माण केलेले मूळ प्रश्न वरवरच्या मलमपट्टीनं आणि 'तडजोडी', 'समझोते' असल्या मार्गांनी डावलल्यासारखेच झाले

## ठरीव साचा

गुजरात आंदोलनाचा आणि राखीव जागांच्या प्रश्नाचा आकडेवारीसह सविस्तर आढावा घेणारी एक पुस्तिका पुण्याच्या शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयानं 'मागोवा प्रकाशन'तर्फे काढली आहे. रा. प. नेने, पुरुषोत्तम पानसे, अनंत फडके, सुधीर बेडेकर आणि सुलभा ब्रह्मे यांनी परिश्रमपूर्वक विविध पुराव्यानिशी हे सारे प्रश्न मांडले आहेत. बेकारी, गरिबी, महागाई, जातीयता अशी अनेक कारणं गुजरात आंदोलनामागच्या प्रवृत्तीच्या मुळाशी आहेत. त्यातून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांचा आढावा या 'राखीव जागा असाव्यात का?' नावाच्या छोटेखानी अभ्यासग्रंथात त्यांनी घेतला आहे.या प्रश्नात नको तितक्या प्रमाणात राजकारण घुसडलं गेल्याची व्यथा त्यांनीही व्यक्त केली आहे. राखीव जागा आवश्यक आहेत असा सार्थ, सप्रमाण आणि निःसंदिग्ध कौल या पुस्तिकेत दिला आहे. दलितांना प्रत्यक्षात मिळणारी अल्प संधी, पारंपारिक मागासलेपणामुळं त्यांना जाणवणाऱ्या अडचणी जातीयतेची बंधनं या साऱ्याचा ऊहापोह त्यात केला आहे. तो करत असताना डावे पक्ष आणि एकंदर डावी शक्ती याबद्दल त्यांनी आशेचा सूर काढला आहे; पण त्यात कितपत तथ्य आहे ? डाव्या-उजव्या सर्वच शक्ती इथल्या राजकारणात लवचिक राहिल्या आहेत संघ-भाजपला 'उजवे प्रतिगामी' म्हणून हिणवणारे आणि स्वतःला 'डावे पुरोगामी' म्हणवणारे मार्क्सवादी कम्युनिस्ट स्वतःची सत्ता धोक्यात आली की, भाजपला प्रेमानं साद घालायला मागं-पुढं पाहात नाहीत, हे केरळचं चित्र ताजं आहे. मार्क्सवाद्यांची ही स्थिती आहे, तर इतरांच्या तत्त्वनिष्ठाची हमी कशाला द्यावी ? जाहीर धोरणात इथले सगळेच पक्ष पुरोगामी आहेत, तत्त्वनिष्ठ आहेत. प्रत्यक्षात त्यांचा वैचारिक पाया इतका ढिसूळ आणि इतका प्रवाही आहे की, कुणीही कुणाशीही युती करू शकतो, हा अनुभव आहे अशा स्थितीत डाव्या-उजव्या शक्ती आणि पक्ष यांच्यावर डोळे लावून बसण्यात फारसा अर्थ दिसत नाही; पण या पुस्तिकेची सर्व अभ्यासपूर्णता जमेला धरूनही अखेर तीही एका पक्षीय विचाराचंच प्रतिनिधित्व करते, ही वस्तुस्थिती आहे. कम्युनिस्टांच्या दृष्टीनं सर्व रोगांचं मूळ एकच आहे. ते म्हणजे भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि हे कारण नष्ट केलं की, जणू काही सर्व रोग एकदम बरे होणार आहेत. या पुस्तिकेचा रोख हेच सांगतो. 'दलितांची-श्रमिकांची एकजूट आणि एकजूट झाली तर दोघांचेही प्रश्न सुटायला ते उपकारक ठरेल', असा विचार त्यात मांडला आहे. हे न होण्याचा ठपका पुन्हा भांडवलशाही चौकटीवरच आहे सामाजिक, आर्थिक, पारंपारिक, सांस्कृतिक अशा अनेक कारणांच्या गुंत्यातून निर्माण झालेली आजची कोंडी ही अशी साचेबंद तत्त्वं मांडून, त्याच त्या चौकटीत परिस्थिती कोंबायचा प्रयत्न करून सुटणार नाही. वास्तवातून मार्ग शोधले गेले पाहिजेत. कुठल्याही पक्षीय विचारांच्या चौकटी सगळीकडं सारख्याच कशा उपयोगी पडतील ?

'राखीव जागा असाव्यात का'मधला हा सूर गृहीत धरूनही जनजागृतीच्या दृष्टीनं ही एक चांगली पुस्तिका म्हणता येईल. 'दलितांच्या समस्या म्हणजे राखीव जागांचा प्रश्न असे जे समीकरण रूढ होऊ लागले आहे ते सोडून द्यायला हवे.' त्याचबरोबर असंख्य असंघटित, पारंपारिक व्यवसायांत गुंतलेल्या दलितांचे प्रश्न फार महत्त्वाचे आहेत, हे स्पष्टपणे बजावण्याचं कामही या पुस्तिकेनं केलं आहे. गुजराथमध्ये चार दिवस जाऊन येऊन 'पाहणीनंतरचे विचार' म्हणून भडक भाषणं करण्यापेक्षा हे कार्य जास्त मोलाचं आहे आणि समाजसेवकाकडून वास्तविक त्याची जास्त अपेक्षा आहे.

पण दुर्दैवानं आपले समाजसेवक किंवा सामाजिक विचारवंत क्रियाशीलतेच्या फंदात फारसे पडत नाहीत. भाषणं देणं, एखाद-दुसरा लेख लिहिणं, मुलाखत देणं एवढ्यापुरतच त्यांनी आपलं कार्य मर्यादित केलेलं आहे. दलित-नेते काय किंवा अन्य पक्षांचे नेते काय मेळाव्याला प्रतिमेळावा आणि आरोपाला प्रत्यारोप असा लढा खेळत असतात. त्यांच्या राजकारणाचा, सत्ताकारणाचा तो एक अपरिहार्य भाग झाला आहे. समाजसेवकांनी तसल्याच खेळात रमण्यात काय अर्थ आहे ? या प्रश्नाच्या मुळावर आघात करण्यासाठी लोकशिक्षण हा खरा मार्ग आहे. अस्पृश्यता-जातीयता या साऱ्याचं मूळ परंपरेच्या पगड्यात, त्यातून निर्माण झालेल्या प्रवृत्तीत आहे. त्या दृष्टीनं पाहता, राखीव जागा हव्यात की नकोत, हा तसा वरवरचा प्रश्न ठरेल. ही प्रवृत्ती नष्ट करून नवं सामंजस्याचं, समतेचं वातावरण निर्माण होणं हा फार जवळचा प्रवास नाही; पण तो केव्हा तरी निखळ सामाजिक भूमिकेतून सुरू व्हायला हवा आणि आज काही प्रमाणात तो सुरू झाला असेल तर त्याची गती वाढवायला हवी. समाजाच्या सर्वच घटकांनी यात सहभागी व्हायला हवं. निदान सुजाण लोकांनी तरी 'देशाच्या पुन्हा फाळणीचा धोका', 'वर्गसंघर्षाची नांदी' असल्या भडक प्रचारकी थाटात न गुंतता लोकशिक्षणाकडं वळणं हाच यातला खरा मार्ग आहे. नाही तर राजकारणाप्रमाणंच समाजकारणाचंही व्यावसायिकीकरण होईल आणि आणखी कितीही वर्षं गेली तरी प्रश्न होते तिथंच राहतील. त्यातून नव्या असंतोषावर आधारलेल्या नव्या जाती निर्माण होतील, असाच इशारा गुजराथ आंदोलनातल्या शक्तीच्या मांडणीनं दिला आहे.

—विजय कुवळेकर


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

(आकाशवाणीच्या सौजन्याने)

# वाचनाची अभिरुची

जे. एन. पोंडा

सुखवस्तु कुटुंबात वाचनाची अभिरुची कौटुंबिक वातवरणामुळे अगदी लहान वयात निर्माण होते. इतर कुटुंबात मात्र मुलाच्या जाणिवा विकसित झाल्यावरच वाचनाची गोडी लागते. आई–वडिलाना जर वाचनाचा षौक असेल तर लहान मूल पुस्तकाच्या सान्निध्यात वाढते. घरची इतर मंडळी पुस्तकात आणि मूलही उलटे पुस्तक धरून बाबांसारखे गंभीर होऊन पुस्तकातील अक्षरांवरून इकडून तिकडे डोळे हलविण्याचा आणि वाचण्याचा आव आणते.

वाचनाच्या अभिरुचीची आवड निर्माण होते ती चित्रापासून. चिमण्या–गोजिरवाण्याना रंगीबेरंगी चित्र दिसतात आणि ती चित्रे कसली आहेत याबद्दल त्याच्या प्रश्नाचा भडिमार सुरू होतो. जेव्हा चिमणं चित्र ओळखायला लागत तेव्हा आई–वडिलाचा आनद घरात मावेनासा होतो. मग लीव्हिंगरूममधले बाळ मॉंटेसरीमध्ये किंवा बालवाडीमध्ये जात आणि आद्याक्षरे ओळखू लागते, या वेळी तर आई–वडिलाचा आनद अगदी गगनात मावेनासा होतो. नंतर मुलाला राजाराणीच्या आणि इतर गोष्टींची आवड लागते. अर्थात गोष्टींची आवड तोंडी सागितलेल्या ' एक होता काऊ...एक होती चिऊ ' इथूनही लागते. वाचण्याच्या अभिरुचीची पाळेमुळे अशी चित्रातून आणि आजीच्या गोष्टीतून रुजलेली असतात.

एकदा मी एक पुस्तक वाचीत होतो. शेजारी माझा छोटा मुलगाही वाचीत बसला होता. माझ्या मुलाने सहजगत्या माझे पुस्तक हातात घतल आाण म्हणाला, 'बाबा, तुमचे पुस्तक वाईट आहे. त्यात एकही चित्र नाही. माझ्या पुस्तकात बघा केवढाली चित्रे आहत ! ' त्यामुळे लगेच कालचक्राचे फेरे उलट फिरले आणि मी एकदम भूतकाळात फकला गेलो. छोटा झालो. त्याच्याच पुस्तकात दंग झालो आणि एका बैठकीत त्याला गोष्ट सागून टाकली. मला कबूल करावे लागले की, त्याचे चित्रमय पुस्तक माझ्या चित्रविरहित शुष्क पुस्तकापेक्षा पुष्कळच चांगले आहे !

मला असे सागायचे आहे की Catch them young या म्हणीनुसार वाचनाची अभिरुची लहानपणापासूनच वाढायला हवी. चित्रमय पुस्तके, पुस्तकाचे सान्निध्य, काऊ-चिऊच्या गोष्टी असे सर्वपोषक वातावरण हवे. पाश्चात्य देशांतील बालवाङ्मयाचा दर्जा इतका सुदर असतो की वाचनाच्या अभिरुचीची घडण त्या वयातच होते.

एकदा मुलाना वाचनाची गोडी लागली की मग वयाबरोबर वाचनाची अभिरुचीही बदलत जाते. वाचनाची आवड कोवळ्या मुलावर लादण्याचा कुणीही प्रयत्न करू नये असे मला वाटते. मुलांनी शंकाकुशंका विचारल्यास त्याची उत्तरे अवश्य द्यावी. वाचण्याच्या आवडीचा साधारण क्रम असा असतो : बालवयात परीकथा, राजाराणी; कुमारवयात साहसकथा; पौगंडावस्थेत लैंगिक आणि शृंगारिक कथा; लग्नानंतर मानसशास्त्र, शिशुसंगोपन, करिअरच्या उबऱ्यावर कुणी असेल तर त्याच्या व्यवसायाविषयी; याशिवाय अधूनमधून ज्ञानमनोरंजन आणि वेळ घालविण्यासाठी वाचन असतेच. साधारण वयाच्या पचविशीनतर वाचनाची अभिरुची स्थिरावते. वाचनाच्या अभिरुचीची घडण होण्यात स्वत.च्या अनुभवविश्वाचा वाटा फार मोठा असतो. उदाहरणार्थ स्वतःचे आयुष्य जर सुखात गेले असेल तर त्या वाचकाना शोकातिका कमी आवडतात. सुमारे ३२–३५ वर्षे वयाच्या पुढे गूढ आणि आध्यात्मिक विषयाची आणि चरित्र–आत्म–चरित्राची काही वाचकाना ओढ लागते.

सेक्सला फ्रॉईड किती महत्त्व देत असे हे सर्वाना माहीत आहेच. सुरुवातीस त्याचा अनुनय करणारा आणि नतर त्याच्याशी मतभद झालला युग याने Personal आणि Collective unconcious वर भर दिला; पण माणसाची मुख्य निवड असत ता (self expression) आत्माभिव्यक्तीचा. वाचनाच्या अभिरुचीने आत्माभिव्यक्तीच्या कक्षा रुंदत रुंदावत असतात. ज्या गतीने तांत्रिक ज्ञानाचे पापुद्रे काढले जातात त्याच गतीने जर मनाचे पापुद्रे काढले तर कदाचित असे आढळून येईल की, आत्माभिव्यक्तीची संधी न मिळाल्यामुळे आणि निसर्गाशी फारकत घेतल्यामुळे अधिकाधिक लोक गुन्हेगारीकडे वळतात. आत्माभिव्यक्तीने माणसाची आत्मसमर्थनाची आणखी एक महत्त्वाची गरज भागते. मतभेद झाले, भांडण झाले की आपण हिरीरीने आपले समर्थन करतो. तत्त्वज्ञ तर अस्तित्वाचेच समर्थन करतात. हे सर्व आत्माभिव्यक्तीमुळेच.

जाणीव निर्माण झाल्यानंतर झालेली वाचनाची अभिरुची विजेच्या कल्लोळासारखी असते. इथे दलिताचे उदाहरण देता येईल. अन्यायाविरुद्ध झगडणे, आपली बाजू मांडणे, शब्दाशी खेळणे हे सर्व बऱ्याच वेळेला वाचनाच्या अभिरुचीतूनच निर्माण झालेले असते.

पुष्कळ वेळा असेही होते की, वर्षानुवर्षे काही लोकाना वाचनाची दिशाच (direction) लागलेली नसते आणि मग एखादे असे झपाटून टाकणारे, आवडत्या विषयावरील पुस्तक त्यांच्या हातात पडते की, त्याच्या प्रभावामुळे दिशाहीन असलेला वाचक एकदम जागा होतो आणि निदान थोडा वेळ तरी दिशा लाभल्याप्रमाणे वाचन करायला लागतो. मी थोडा वेळ हे शब्द वापरले आहेत. कारण वयोमानानुसार वाचनाची अभिरुची आणि दिशा बदलतात हे मी आधी सागितलेच आहे.

वाचनाची अभिरुची जोपसण्यामध्ये आणि तिला दिशा देण्यात ग्रथपालाचा वाटा मोठा असतो. ग्रथपालाचे काम भारतासारख्या अविकसित देशात फार कठीण असते. या अभिरुचीची जोपासना इतकी बिनबोभाट करायची असते की, वरपागी जणू ग्रथपाल काही करीतच नाही असा भास व्हायला हवा. विनोदी टीकाकाराने याचा Negative अर्थ लावू नये आणि एखाद्या शुष्क ग्रथपालाला बघून तो बिनबोभाट सेवा करीत आहे असे उपहासात्मक म्हणू नये. भारतात वाचक आणि ग्रथपाल याचे सबध फार नाजूक आहेत. ते कसे ते मी सागतो.

भावतालचा परिसर स्वच्छ, टापटिपीचा असला तर अन्नाची अभिरुची कशी वाढते हे

प्रत्येक गृहिणी जाणते. आपण वाचत असलेल्या ग्रंथाची अवस्था कशी आहे यावर पुष्कळ प्रमाणात वाचनाची गोडी अवलंबून असते. पुस्तकाचे बाईंडिंग जीर्ण झाले असेल, आत शाईने रेघोट्या ओढल्या असतील, बरीच पाने सुटी असतील तर पुस्तक वाचणे हा एक त्रासदायक अनुभव होऊन बसतो. वाचकाला सतत अशी पुस्तके वाचायला मिळाली तर वाचनाच्या अभिरुचीचे रूपांतर वाचनाच्या अरुचीत सहज होऊ शकते पुस्तक कसे हाताळावे याबद्दलचे अनेक मुद्दे हळूहळू वाचकाला शिकवावे लागतात आणि मग वाचकाशी गैरसमज आणि काही प्रमाणात संघर्षाला सुरुवात होते. कारण भारतात ग्रंथपाल ही एक उपेक्षित व्यक्ती होय. त्याच्या अनुभवाला, त्याच्या कार्याला फारशी किंमत नसत. माझ्या एकवीस वर्षांच्या काळात मला या जटिल प्रश्नाने इतके भेडसावले की माझ्या वाचनालयाचे आर्थिक प्रश्न त्यापुढे फिके वाटू लागले. कधीकधी मी वाचनालय चालवीत आहे की पुस्तके कशी वापरावीत याचे सतत सूचना देण्याचे काम करीत आहे हेच मला कळेनासे होते. याउलट शेकडो वाचकानी मला याबाबतीत सहकार्य दिले हे मी मोठ्या आनंदाने नमूद करतो.

ग्रंथपाल–शिक्षक आणि वाचक-विद्यार्थी अशी ही भूमिका बऱ्याच लोकाना मान्य नसते. खरं म्हणजे ती तशी नसतेच कोणत्याही पोटतिडकीच्या ग्रंथपालाला वाचकाची सेवा करण्याचा आनंद असतो आणि म्हणूनच ग्रंथपालाने भारतात अतिकौशल्याने आणि बिनबोभाट काम करायचे असते.

अन्नाची अभिरुची वाढण्यासाठी गृहिणी खाद्यपदार्थांवर निरनिराळे प्रयोग करते. वाचनाची गोडी वाढावी यासाठी ग्रंथपालानेही नवेनवे प्रयोग करणे आवश्यक आहे. खाद्यपदार्थांवर प्रयोग करताना काही पदार्थ जळतात, बिघडतात; पण शेवटी गृहिणीला घरातील लोकाच्या आवडीनिवडी कळतात. तसेच ग्रंथपालाचेही. मी तर असे म्हणेन की, खाण्यात जसे वेगवेगळे चोचले असतात, जसे डोहाळे लागतात तसेच वाचनाचेही ! जिभेवर जसे taste–buds असतात तसेच मेंदूत reading–buds असतात की काय अशी शंका येते. पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना हे वाचनाच्या बाबतीतही पुष्कळसे खरे आहे. इतकेच नाही तर काही वेळा वाचनाची अभिरुची त्या त्या वेळच्या मनःस्थितीवर अवलंबून असते असे मी कैक वेळा निरीक्षण केले आहे. माझ्या वाचनालयात माझ्या वाचकांच्या अभिरुचीला दिशा मिळावी यासाठी मी एकवीस वर्षे बरेच चाकोरीबाहेरचे प्रयोग केले. त्यातला एक प्रयोग वाचकाला इतका आवडला की, वाचनाच्या अभिरुचीला मी खतपाणी घातले याबद्दल मला थोडेफार समाधान वाटते. हा अपारंपारिक प्रयोग म्हणजे पुस्तकात त्या त्या विषयाची परीक्षणाची आणि लेखकाची कात्रणे लावणे. इतकेच नव्हे तर आम्ही पहिल्या पानावर एखादा असामान्य लेख, बातमी किंवा चित्र असेही लावून पाहिले. माझ्या वाचकाने याला भरपूर दाद दिली. सुरुवातीस मी वाचकाना बाइड केलेल्या कात्रणाची पुस्तक दिली. पुस्तकाही सुटी कात्रणे ठेवून पाहिली; परंतु मला असे आढळून आले की, पुस्तकातच एकरूप झालेली कात्रणे अधिक वाचली गेली. माझे आणखी चाकोरीबाहेरचे प्रयोग म्हणजे आमचे बुकबाइंडिंग, पुस्तकाची ने–आण बंद प्लॅस्टिकच्या पिशवातूनच करणे असा आग्रह वगैरे.

आमच्या कात्रणाच्या प्रयोगामुळे वाचकाच्या वाचनाच्या अभिरुचीमध्ये एक प्रकारची परिपक्वता आली. त्याला अधिकाधिक माहिती मिळू लागली आणि पुस्तकाबद्दल आणि इतर अनेक बाबतीत तो स्वतंत्रपणे निर्णय घेऊ लागला. त्याला हेही कळून चुकले की, ज्या पुस्तकाचे परीक्षण पुस्तकाला वाईट म्हणते ते पुस्तक चागलेही असू शकते. पुस्तकाविषयाची इतर कात्रणे पुस्तकात असल्यामुळे लेखकाच्या विश्वासार्हतेबद्दलही (credibility) त्याला अंदाज यऊ लागला. कोणताही भेदभाव न ठेवता वैयक्तिक वाचकासाठी नव्हे, पण सामूहिक वाचकासाठी ग्रंथपालाने कसोशीने प्रयत्न केल्यास काही वाचकच वाचनाच्या अभिरुचीला आकार आणि दिशा देण्यात सहकार्य देतात असा अनुभव आला.

☐


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सभ्रम ( बुवाबाजीवर मार्मिक टिपण ) अनिल अवचट | रु. | २५/– |
| २. | अरेबियन नाइट्स, भाग ११–गौरी देशपांडे | ,, | ६०/– |
| ३. | जडणघडण ( आत्मचरित्र ) वामन चोरघडे | ,, | ३०/– |
| ४. | चाबक आणि गुलाब ( प्रवासवर्णन ) सुभाष भेंडे | ,, | २५/– |
| ५. | मी : चार्ली चॅपलिन ( अनुवाद ) ग. रा. टिकेकर | ,, | ६०/– |
| ६. | My Own Boswell (Momoirs) M. Hidayatullah | Rs. | 95/– |
| ७. | M. N. Roy : The Men I Met | ,, | 50/– |
| ८. | My Truth / Indira Gandhi ( Nearest thing to her autobiography ) | ,, | 100/– |
| ९. | Life Goes TO WAR–Illustrated | ,, | 70/– |

" शब्दांवर प्रभुत्व असणारी माणसेच
सर्व क्षेत्रात पुढं येतात ! "

–शिक्षण संचालक, वि. वि. चिपळूणकर
( सकाळ, १६–१–१९८१ )

☐ अधिक वाचन करा व शब्दावर प्रभुत्व मिळवा ! ☐

**फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

रंगभूमी

# अंधारा हवा कवडसा

## एकदा बंद पडलेले नाटक...

एक जोडपं. यशवंत आणि शांता. लग्नाला तशी बरीच वर्षं झाली आहेत. जवळ-जवळ बारा वर्षं; पण संसार सुखाचा नाही. दोघेही असमाधानी, अ-सुखी. दोघाचं एक-मेकाशी बोलणं कायम वाकड्यातलंच. म्हणजे जेव्हा ते एकमेकांशी बोलत असतात तेव्हा फक्त भाडणच करतात असं म्हणायला हरकत नाही.

सध्या एका पेनबाम कंपनीत सेल्समनची नोकरी करणारा, भरपूर दारू पिणारा, अगदी उसने पैसे घेऊन 'कंट्री'सुद्धा पिणारा, बाहेर एखादी 'बाई' गटवणारा असा हा यशवंत पूर्वी—अनेक वर्षांपूर्वी लष्करात वगैरे होता. बऱ्यापैकी मर्दुमकी गाजवली; पण एकदा गंभीर जखमी होऊन मृत्यूच्या उंबरठ्यावर पडलेला. शत्रूसैन्य जवळच, कुणी त्याला वाचवायला पुढे येईना. अशातच सदानंद नावाचा शूर शिपाई पुढं होतो. स्वतः जखमी होतो; पण या यशवंतला वाचवतो. ही आठवण यशवंत आपल्या बायकोला नेहमीच ऐकवतो.

आणि त्या गोष्टीचा शाताला प्रचंड तिटकारा—तिरस्कार आहे. आपल्या नवऱ्याचा प्राण स्वतःचा जीव धोक्यात घालून वाचवणाऱ्या मूर्खाचा ती तिरस्कार करते. कारण तिच्या लेखी यशवंतची किंमत शून्य. कवडीमोल. त्याच्याशी लग्न करून तिला कसलंच सुख मिळालं नाही. यशवंतला लष्करात सगळेच 'गाववाले' म्हणत, तो खेडेगावचा शेतकरी असलेला म्हणून; पण वास्तविक त्याच्या मनात त्या सगळ्या गोष्टींबद्दल प्रचंड तिरस्कार होता. तरी पण त्याने होते नव्हते तेवढे पैसे खर्च करून शेत विकत घेतलं खरं.

पण शेत, शेणान सारवलेलं घर या सगळ्या गोष्टी आपल्याला आवडतात असं आपण समजत होतो, तसं सागत होतो, तरी ते तसं नसून आपल्याला त्या सर्व प्रकाराबद्दल प्रचंड तिरस्कार आहे, याचा त्याला साक्षात्कार शेतावर होतो. तसं तो बायकोला सागतो आणि शेत वगैरे सगळं सोडून परत शहरातच येतो.

एका जुनाट चाळीत छोट्याशा घरात दोघाचं एकत्र राहून संसार रेटणं सुरू होतं. लग्नापूर्वी भेटलेला साधाभोळा रागडा यशवंत तसा नाही हे शाताला कळल्यावर ती हादरते, चिडतेपण आणि यशवंतला सोडून जायला निघते; पण जायचं कुठं? या विचारानं शेवटी यशवंतकडेच येते. गेली अनेक वर्षं दोघंही एकत्र फक्त रहात असतात. नवराबायको हे नातं सर्वच दृष्टींनी केव्हाच संपुष्टात आलेलं असतं.

तर अशा या घरामध्ये एक दिवस एक खास पाहुणा येणार असतो—यशवंतचा दोस्त सदानंद. हाच तो सदानंद—ज्यानं यशवंतचा युद्धामध्ये जीव वाचवलेला असतो. सुमारे १५–२० वर्षांनंतर यशवंतला तो भेटण्यास येणार असतो. त्याच्यासमोर आपला संसार सुखाचा आहे असं नाटक करायचं हे यशवंत शाताला वारंवार सांगतो.

सदानद येतो. आपण बंगलोरला रहातो, इस्टेटएजटचा धंदा करतो, त्या पायी गावोगाव भटकावं लागतं असं सागतो. आपल्यावरून यशवंतन त्याच्या मुलाचं नाव सदानंदच ठेवलं आहे, हे त्याला कळल्यानं तो खूपच आनंदी झालेला असतो. त्याच्यासाठी एक सुरेखशी आगगाडी आणलेली असते; पण त्याला तो छोटा सदानंद मात्र दिसतच नाही. फोटोपण नसतो. तो मामाकडे गेला आहे आणि फोटो सगळे शाताच्या माहेरच्यांनी नेले या उत्तरावर तो समाधान मानतो.

हे दोघे जुने दोस्त गप्पा मारत असतात. बोलता बोलता थोडासा नशेत असलेला यशवंत आपण सुखी नसल्याचे सांगतो. शेतीवाडीचीही हकीकत सागतो. थोडंसं त्या दोघाचं भाडण होतं. सदानंद तरातरा निघून जात असताना जिन्यावरून पडतो, बेशुद्ध होतो.

यशवंत त्याच रात्री सदानंदच्या आईला फोन करतो. ती सदानंदला बघायला येते आणि सदानंदविषयीचे एक रहस्य आपल्यासमोर येतं. सदानंद इस्टेटएजट वगैरे काहीच नसतो. यशवंतला वाचवण्याच्या वेळी झालेली जखम काही वर्षांनी त्रास देऊ लागते, म्हणून मेडिकलच्या शेवटच्या वर्षी तो शिक्षण सोडतो. आयुष्यभर इस्पितळातच रहावं लागणार हे जाणून तो होणारा प्रेमविवाह रद्द करतो आणि या इस्पितळातून त्या इस्पितळात हिंडत राहतो. आपले शेवटचे दिवस राहिले आहेत हेही तो जाणून असतो. त्याच्या आईकडून यशवंतला हे सगळं कळतं. सदानंद यशवंतकडे आलेला असतो तो केवळ आपलं हे होणारं बलिदान व्यर्थ गेलेलं नाही हे पाहण्यासाठीच आलेला असतो. आपल्या नावावरून नाव ठेवलेला यशवंताचा सदानंद पाहण्यासाठी आलेला असतो एक सुखी कुटुंब पाहण्यासाठी आलेला असतो.

अखेरीस सदानदला यशवंतच्या या संसाराचं रहस्य कळतं. (सगळा फ्लॅशबॅक मी अगोदरच सागून टाकला आहे) त्याना मूल नाही हेही कळतं आणि शेवटी दु:ख घेऊनच तो निघून जातो. यशवतचे सगळे प्रयत्न फिकेच पडलेले असतात. यशवंतला मात्र आपण सदानंदला 'सुखी संसाराचं' चित्र पटवून दिल्याचं समाधान असतं.

आता गंमत अशी की, साधी भरघोपट कथा, त्याला रहस्याची फोडणी देऊन थोऽऽडसं भडक करून लोकाना का सांगावं? मानवी स्वभाव, मनाचे कगोरे, एकमेकांशी सबंध याचं वेगळं चित्रणही यात नाही. मग हे सर्व प्रेक्षकाना का दाखवावं?

दुसरं असं की या नाटकात, त्याच्या कथेशी, पात्राशी प्रेक्षक अजिबात समरस होऊ शकत नाही. एक कथा, जी फारशी आनंदपर्यवसायी नाही, ती आपण (उगीचच) पहात आहोत एवढेच वाटते. कथाबीज खूप लहान आहे. नाटकही तसे लहानच म्हणावे लागेल; पण ताणले गेल्यासारखं वाटते. यामुळेच नाटक वेगवान पकड घेणारे होत नाही.

डॉ. मोहन आगाशे (सदानंद) सदाशिव अमरापूरकर (यशवंत) आणि शांता (लालन सारंग) या तीन मुख्य कलावंतांनी नाटक छान पेलले एवढंच. तिघेही जुने आणि जाणते नट वगैरे आहेत; पण भूमिकेत झोकून देणे, समरस होणे वगैरे प्रकार नाहीत. दिग्दर्शन श्री. सदाशिव अमरापूरकर

ह्यांचेच आहे. त्यांना फार वेगळे करून दाखवण्याला वाव नाही. प्रयोग या दृष्टीने प्रयोग नेटका छान होतो.

यशवंतच्या घराचा एकच सेट आहे. जुनाटपणा आणि यशवंतच्या घरातील आर्थिक स्थिती तो सेट छान दाखवतो. संगीत व प्रकाश प्रसंगांना पोषक आहे एवढेच म्हणता येईल; पण अवास्तव प्रमाणात वापरायचे म्हणून वापरलेले नाहीत हेही महत्त्वाचे आहे.

एकंदरीत ७२-७३ च्या सुमारास कै. सतीश दुभाषी, श्रीकांत मोघे व आशा पोतदार यानी केलेले आणि बंद पडलेले हे नाटक परत रंगभूमीवर का आणले, कुणास ठाऊक. शीर्षकही साजेसे वाटत नाही किंवा असे असेल की, सदानंदच्या रिकाम्या अंधाऱ्या आयुष्यात यशवंतचा सुखी संसार पाहणे ही इच्छा, हाच कवडसा हवा असेल आणि आपला जीव वाचवणारा मित्र सुखाने मरावा, त्याच्या मनात आपण खूप सुखी आहोत हे दाखवून तो समाधानी असल्याचं समाधान मानावं हा कवडसा यशवंतला हवा असेल. अर्थात असा आपण अर्थ काढायचा. कारण अगदी सरळसोट व्यक्तिरेखा दाखवल्यावर तसेच म्हणावेसे वाटते.

शांताचे त्याच चाळीतील डेव्हिडशी संबंध असलेले का दाखवले? यशवंतचा संसार नासका आहे हे सदानंदला दाखवण्यासाठी? त्या प्रसंगाने नाटकाच्या परिणामात काहीच बदल होत नाही.

एकंदरीत इंडियन नॅशनल थिएटर हा बॅनर, शं. ना. नवरे हे लेखकाचे नाव, गाजलेले नट 'दोन जिवलग दोस्तांच्या प्रेमाची जीवघेणी नाट्यकृती' ही जाहिरात वाचून जावे तो पदरी अपेक्षाभंगाचे दुःखच पडते.

—निखिल गजेंद्रगडकर

चित्रपटाबाहेर

# त्यांचे हात जिथे पोचले आहेत तिथे आपले साधे पत्रही पोचू शकत नाही....

हिंदी चित्रपट 'रुपेरी पडद्यावर' झळकण्याआधी त्याला प्रसिद्धीच्या झोतात आणलं जातं रस्तोरस्ती लटकलेल्या जाहिरातींद्वारे. प्रेक्षकांना चित्रपट पाहण्यास प्रवृत्त करण्याच्या दृष्टीनं जाहिरातींचा वापर केला जातो. एका अर्थानं निर्माता या जाहिराती, पोस्टर्स, बॅनर्सच्या द्वारे प्रेक्षकाच्या मनात 'त्याच्या' चित्रपटाचं अॅडव्हान्स बुकिंगच करत असतो. मुंबईसारख्या महानगरात तर चहूकडे दिसेल त्या खांबाचा अथवा भिंतीचा आधार घेऊन पसरलेली ही चित्रपटांची पोस्टर्स मुंबईच्या भाऊगर्दीतही पायाला 'घड्याळ' लावून वेगात धावणाऱ्या माणसाला 'पोझ्' घ्यायला लावतात. काहीशा भडक रंगानं शहारलेल्या परंतु थोडीफार का होईना चित्रकलेची बूज राखणारी ही पोस्टर्स, काही वेळ का होईना थांबवितात... आकर्षित करतात.. आगामी चित्रपटाबाबत उत्सुकता निर्माण करतात...

या मुंबईतलाच एक इंग्रजी चित्रसमीक्षक यातील काही पोस्टर्सपाशी थबकला तो थोडा वेळ नव्हे तर बराच वेळ आणि त्याला बरंच काही दिसलं तेच त्यानं कागदावर नोंदलं.

मुंबईतल्या भायखळा ब्रिजपाशी 'क्रांती' चे बॅनर लागून दोन दिवस झाले होते. काही लहान मुलांनी दगड मारून ते बॅनर फाडलं. सुमारे ३००० रुपयांचं हे बॅनर दोन दिवसानंतर हलवलं गेलं. या समीक्षकाला प्रश्न पडला की, हा काही व्रात्य मुलाचा छंद आहे का हा कट आहे?

एका रेल्वेप्लॅटफॉर्मजवळ 'शान' चं पोस्टर लटकलं होतं. एका तेरा-चौदा वयाच्या बुटपॉलिश करणाऱ्या मुलान त्या पोस्टरवर चढून, हेमा, राखी व परवीन बाबी या चित्रावर, आपल्याजवळील काळ्या पॉलिशचा वापर करून दाढी-मिशा काढल्या... पुन्हा तोच प्रश्न उभा राहिला, हे सर्व गंमत म्हणून चाललंय का ही पूर्वनियोजित अशी योजना आहे?

समीक्षकानं चक्क बूटपॉलिशवाल्या पोरालाच गाठलं. 'थम्स अप' ची लाच देऊन मुलाखत सुरू झाली.

पोरानं कबुली दिली, 'कभी कभी कोई पैसा देता है पोस्टर्स खराब करने के लिए... !'

'दर पोस्टरला दोन रुपये पुरेसे होतात. त्यात माझाही पॉलिशचा खर्च सुटतो. महिन्यातून एखाद्या वेळी हे पैसे मिळतात. सुमारे शंभर रुपयांचा धंदा होतो!' असं सांगून पोरान 'मेरा नाम मत लेना' असं म्हणत पैसे देणाराचं नाव सांगितलं.

चित्रनिर्मात्याचा प्रतिनिधी म्हणून 'त्या' गृहस्थाकडे हा समीक्षक पोचला तर त्यानं चक्क 'रेटकार्ड' च समोर ठेवलं. 'दादर, घाटकोपर, मध्य व पश्चिम रेल्वे या क्षेत्रात कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर १००० रुपये अथवा दर पोस्टरमागे १० रुपये!

तेव्हा पैसे घेऊन पोस्टर खराब करण्यापुरतंच हे रॅकेट अस्तित्वात नसून चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अशा चित्रपटाना फर्स्ट रनमध्येच एक गठ्ठा तिकिट खरेदी करून चित्रपटगृहात गोंधळ माजविणे, गाण्यांच्या वेळी उठून जाणे, भावनात्मक दृश्यांच्या वेळी शेरेबाजी करणे व चित्रपट संपल्यावर 'फिल्म बंडल है!' 'फ्लॉप हो जाएगी' असे उद्‌गार दुसऱ्याला ऐकू जावे यासाठीच काढणे इत्यादी प्रकारचंही धाऊक कॉन्ट्रॅक्ट या रॅकेटद्वारे घेतलं जातं.

फक्त नकारात्मक वातावरणच तयार करणं हा उद्देश नसतो तर वितरकाकडून पैसा मिळाल्यास योग्य वेळी योग्य शेरेबाजी, शिट्ट्या, टाळ्या वाजवून चित्रपटाबाबत चांगलं वातावरण ही मंडळी तयार करतात.

अंधेरीच्या झोपडपट्टीत राहणारा एक 'बेवडा' या समीक्षकाला भेटला आणि म्हणाला, 'लोकांना चित्रपट पाहण्यासाठी पैसे खर्च करावे, लागतात मला चित्रपट पाहण्यासाठीच पैसे मिळतात... कसं काय?'

'जपानी दादाच्या गँगसाठीच सर्व काही चाललेलं असतं. तो सांगेल तो चित्रपट पाहून आम्ही तो सागेल तसं करतो. एवढंच काय, कोणत्या वेळी चित्रपट अर्ध्यावर सोडून बाहेर पडायचं, केव्हा केव्हा ओरडायचं हे अगोदरच त्यानं ठरवलेलं असतं आणि तसंच आम्ही करत असतो.'

या बेवड्याचा पोरगा सुद्धा रात्री बॅनर्स झाडायचं काम करतो. जर बॅनर फाडला तर त्या आळीतल्या पोराना चहा-पाण्याला पैसे मिळतात.

चित्रपट-संगीताच्या क्षेत्रातही हाच प्रकार चालू आहे. सी. मोहन हा मुबईचा पोस्टर-डिझायनर म्हणतो, 'शांतीभाई हा माणूस कल्याणजी–आनंदजीनी व मठुभाई हा माणूस लक्ष्मीकात प्यारेलाल या संगीतकारानी पोसले आहेत.' या दोघाचं काम ठरलेलं आहे. आपल्या गँगच्या खिशात पैसे कोंबून हॉटेलात विशिष्ट गाणी सारखी वाजविणं, इतर संगीतकाराचे चित्रपट चालू असलेल्या चित्रपटगृहात जाऊन 'गाण्यांच्या' वेळी गोंधळ घालणं.

या दोघांसह किशोर राणा नावाचे गृहस्थ विविध भारती व सिलोन केंद्रासाठी याच दोन संगीतकारांची अथवा त्यानी कॉंट्रॅक्ट घेतलेल्या संगीतकारांच्या गाण्यांचीच फर्माइश रोज हजारो पत्रं पाठवून करत असतात.

तेव्हा ही मंडळी आणि याना पोसणारी फिल्मवाली मंडळी बरीच पोचलेली आहेत. त्यांचे हात जिथं पोचलेले आहेत तिथं आपले हातच काय, पत्रसुद्धा पोचू शकत नाही हेच खरं!

—बिलंदर

## लोकसेन ललवाणींचा राजीनामा!

लोकसेन ललवाणीनी फिल्म डिव्हिजनमधील आपल्या पदाचा राजीनामा दिला. ललवाणीच्या राजिनाम्यामुळे एका वेगळ्याच प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. फिल्म डिव्हिजनसारख्या सरकारी अखत्यारीतील विभागात नोकरी करूनसुद्धा 'सामाजिक बांधिलकी' पत्करणारे हे गृहस्थ अन्याय, अत्याचार आणि शोषण इत्यादी विषयाशी संबंधित घटनावर डाक्युमेंटरीज् काढण्यासाठी प्रसिद्ध आहेत.

कोळसा खाणीतील कामगारांच्या हृदयद्रावक परिस्थितीचे मर्मभेदी चित्रण करणाऱ्या त्याच्या 'अंगार पत्थर' या लघुचित्रपटाने आतरराष्ट्रीय पारितोषिक मिळविले होते. या लघुचित्रपटानंतर त्यानी 'मुझे चमार कहते है' हा चित्रपट बनवला. या लघुचित्रपटात हरिजन महिलेशी विवाह करणाऱ्या ब्राह्मणाने आपल्या उपजीविकेसाठी चांभारकीचा धंदा स्वीकारल्यानंतर, त्याच्यावर होणाऱ्या 'सामाजिक अत्याचारांचे' चित्रण केले आहे. उत्तर प्रदेशातील एका गावात राहणाऱ्या दीक्षित नावाच्या गृहस्थाची ही खरीखुरी कहाणी त्यांनी त्याच्याच शब्दात व्यक्त केली आहे. सत्य घटनेवरील 'मुझे चमार कहते है' मध्ये ललवाणी येथील जाती–समस्येचा गुंता दाखवितात. या लघुचित्रपटाची मुक्त कंठाने प्रशंसाही करण्यात आली आहे.

मात्र या लघुचित्रपटामुळे भारताची प्रतिमा डागळली जात असल्याचे कारण देऊन भारत सरकारच्या विदेश विभागाने हा लघुचित्रपट परदेशी चित्रपट महोत्सवात दाखविण्यास बंदी घातली. या बंदीचा निषेध म्हणूनच ललवाणीनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. ललवाणीच्या चित्रपटाबाबतचा सरकारी दृष्टिकोन म्हणजे नर्गिसने सत्यजित रायच्या चित्रपटाबाबत घेतलेल्या आक्षेपाचेच फलित आहे. तेव्हा आज ललवाणीचा चित्रपट अडविला आहे; उद्या सत्यजित रायचा चित्रपट अडविला जाणार नाही काय?

*



सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)


महागाई, महागाई, वाढती महागाई...
अशा महागाईत कितीही पैसा मिळाला तरी कमीच.
संसारी माणसाला अनेक आर्थिक गरजा असतात. परंतु,
महागाईमुळे अनेक नडींना मुरड घालावी लागते.
पण ते तर काही वेळा अशक्य असते.
या भाववाढीवर उपाय एकच. बँक ऑफ महाराष्ट्र मधील
बचत खाते. त्यामधील शिल्लकच आपल्या आर्थिक गरजा
भागवील.

बचतीची सवय बाणवा. बचतीसाठी बँक ऑफ महाराष्ट्र.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
'लोकमंगल', शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

RAAS/BM/1004